ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
जुलै २०२३
किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४ वर्ष : ६८
अंक : ४
पुणे.

# जीवन शिक्षण

Jeevan Shikshan
July 2023
Price ₹30
Pages 44 Vol. : 68
Issue : 4
Pune.

## वाचन सिद्धी विशेषांक - भाग २



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे दि. १७ ते २२ जून २०२३ या कालावधीत G20 परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. 'वसुधैव कुटुम्बकम्' हे ब्रीद घेऊन पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या संकल्पनेवर आधारित ही परिषद भरविण्यात आली होती. याप्रसंगी जगातील २९ देश आणि भारतातील ३० राज्यांनी सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून G20 परिषदेच्या प्रदर्शनामध्ये स्टॉल उभारण्यात आला होता. यामध्ये MPSP, मुंबई, SCERT, महाराष्ट्र, पुणे तसेच अन्य शैक्षणिक कार्यालयांनी एकत्रित येऊन स्टॉल उभारणीमध्ये योगदान दिले. याप्रसंगी सदर स्टॉलचे उद्घाटन मा. श्रीम. अन्नपूर्णा देवी, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री, मा. दीपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री, आणि मा. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. तदनंतर मा. धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय शिक्षण मंत्री यांनी महाराष्ट्राच्या स्टॉलला भेट देऊन राज्याच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.





# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६८ | जुलै, २०२३ | अंक ४ था



❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) — **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** — **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** — **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि सामाजिक शास्त्रे व कला–क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** — **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**ज्योती उपाशी,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू) — **सदस्य सचिव**

❖ **निर्मिती सहायक :**
अरुण जाधव, अधिव्याख्याता, प्रसारमाध्यम व सी.पी.डी. विभाग

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.



❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,५००

❖ **मूल्य : रु. ३०/– वार्षिक वर्गणी रु. ३००/–**


## वाचन सिद्धी विशेषांक – भाग २

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | – | ४ |
| ❖ प्रसंगपद्धतीचे वाचन कसे शिकवावे? | प्राचार्य सी. रा. तावडे | ५ |
| ❖ 'वाचायला' शिकवायचे की 'वाचते' करायचे? | प्राचार्य लीला पाटील | १० |
| ❖ शाळास्तरावरील वाचन कौशल्य विकास प्रक्रियेचे अनुधावन | डॉ. राजेश बनकर | १५ |
| ❖ वाचनछंद कसा जोपासावा? | डॉ. प्रदीप आगाशे | १८ |
| ❖ ज्योत दिव्यत्वाची | डॉ. जगराम भटकर | २० |
| ❖ 'दृक्–साक्षरता' | डॉ. चित्रा सोहनी | २३ |
| ❖ वाचन संस्कृती आणि मी | अविनाश हळबे | २५ |
| ❖ वाचनगतीचे मापन | डॉ. इब्राहिम नदाफ | २८ |
| ❖ वाचूया आनंदे | डॉ. दत्तात्रेय तापकीर | ३२ |
| ❖ सोप्याकडून कठिणाकडे – वाचन कौशल्य उपक्रम | रावसाहेब शितोळे | ३५ |
| ❖ गोष्टी वाचनातून मुलांचा भाषाविकास | शुभांगी भोसले | ३७ |
| ❖ फिरते बालवाचनालय | लक्ष्मीकांत ईडलवार | ४० |
| ❖ इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०. **दूरध्वनी :** ०२०–२४४८८३८२ **ई–मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



मित्रांनो,

'वाचन सिद्धी विशेषांक – भाग २' आपल्या हाती देताना मला खरोखरच आनंद होत आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने दरमहा 'जीवन शिक्षण' हा अंक प्रसिद्ध केला जातो हे आपणास ज्ञात आहेच. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची अंमलबजावणी राज्यामध्ये टप्प्याटप्प्याने सुरू झालेली आहे. सदर धोरणात उल्लेख केल्याप्रमाणे देशातील आणि राज्यातील विद्यार्थ्यांच्या वाचनाचा विविध संस्थांनी घेतलेला आढावा, विश्लेषण यांची माहिती पाहता, अजूनही आपल्या मातृभाषेमधून मुलांना अस्खलितपणे वाचन करता येणे, समजून घेऊन वाचन करता येणे यामध्ये अडचण येते, असे लक्षात आले. मराठी विषयाचा विचार करता, वाचन, लेखन, श्रवण, भाषण, सुसंवाद इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आधी वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे.

अवांतर वाचन केल्याने विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात. पर्यायाने त्यांची आकलनशक्ती वाढण्यास मदत होते; तसेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिगत विकास होऊन समाजामध्ये वाचन संस्कृती रुजण्यास मदत होते, म्हणूनच 'वाचाल तर वाचाल' असे म्हटले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी तर 'एक चांगले पुस्तक, शंभर मित्रांप्रमाणे असते', असे म्हटले आहे.

राज्यभाषा मराठीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्यशासनाने ठोस पावले उचललेली आहेत. मराठीसाठी स्वतंत्र प्रशासकीय विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांमधून मराठी हा विषय कायद्याने सक्तीचा करण्यात आलेला आहे. यासाठी मराठी भाषा सल्लागार समितीची स्थापनाही करण्यात आलेली आहे.

ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी शासनाच्यावतीने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे वाचन कौशल्य विकसित होण्यास मदत होणार आहे. माहे जून, २०२३ चा अंक वाचनावर आधारित असून 'वाचन सिद्धी विशेषांक – १' एक या नावाने प्रसिद्ध करण्यात आला होता. माहे जुलै, २०२३ च्या अंकास 'वाचन सिद्धी विशेषांक – भाग २' असे नाव देण्यात आले आहे.

या विशेषांकामध्ये 'प्रसंगपद्धतीचे वाचन कसे शिकवावे?' या लेखात धूळपाटी ते गट, शब्द, वाक्य, गोष्ट इत्यादी पद्धतीने विद्यार्थी ते प्रौढ माणसांना जलद वाचन शिकण्यासाठी उपयुक्त पडणाऱ्या गोष्टी उदाहरणांसह देण्यात आलेल्या आहेत. प्राचार्य लीला पाटील यांनी 'वाचायला' शिकवायचे, की 'वाचते' करायचे? या लेखात वाचते करण्यावर भर दिला पाहिजे हा विचार मांडताना वाचनाने आयुष्य प्रकाशमान होते असे म्हटले आहे. 'शाळा स्तरावरील वाचन कौशल्य विकास प्रक्रियेचे अनुधावन' या लेखात वाचन कौशल्याच्या विकासातील अडथळ्यांचा शोध घेऊन वाचन कौशल्यांचे विकसन करण्यासाठी कोणते उपक्रम राबवण्यात यावेत याविषयी विवेचन केले आहे. डॉ. प्रदीप आगाशे यांच्या लेखात वाचनाचा छंद जोपासण्यासाठी पालक काय करू शकतात, शाळा कोणते उपक्रम राबवू शकतात याचे विस्ताराने विवेचन केले आहे. 'ज्योत दिव्यत्वाची' या लेखातून वाचन हे मानवी व्यक्तिमत्त्वावर उपयुक्त परिणाम करणारे साधन आहे याची उत्कृष्ट मांडणी केली आहे. वाचनगती, वाचनासाठीचे उपक्रम, गोष्टी वाचनाचा उपयोग, वाचनालय उपलब्ध करून देण्यासाठी वापरलेली अनोखी उपाययोजना अशा वाचनाशी संबंधित अन्य लेखांमधून व्यक्त झालेले विचार सर्व शिक्षक, पर्यायाने विद्यार्थी, पालक यांच्यासाठी उपयुक्त ठरतील असा मला विश्वास आहे.

सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
तथा संपादक, जीवन शिक्षण

# प्रसंगपद्धतीचे वाचन कसे शिकवावे?

प्राचार्य सी. रा. तावडे

बालवर्गातील मुलांना अक्षरओळख करून देऊन वाचावयास शिकवणे हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. महत्त्वाचा म्हणण्याचे कारण ज्ञान मिळविण्याचे पहिले व प्रमुख साधन म्हणजे 'वाचन' होय. वाचनाला प्रथमारंभ बालवर्गात होतो. अर्थात पाया जितका मजबूत तितकी त्यावरची इमारत टिकाऊ बनणार, ही गोष्ट लक्षात घेऊन आजपर्यंत अनेक विद्वान, अनुभवी शिक्षण-शास्त्रज्ञ व शिक्षक यांनी वाचनारंभ करण्याच्या निरनिराळ्या पद्धती घालून दिल्या. उत्तम वाचता येणे, ही एक कला आहे व ती शक्य तितक्या लवकर सुलभ व मनोरंजक रीतीने शिकवता येण्याकरता पुष्कळांनी परिश्रम घेऊन वाचनारंभाच्या पद्धती घालून दिल्या. अनुभव घेऊन एखादी पद्धती ठरवावी; तिचा प्रयोग करून पाहावा; तिजपासून जो फायदा मिळेल तो पदरात घ्यावा आणि काही काळाने पुन्हा तीच पद्धती अपुरी ठरून तिच्यातील दोष घालविण्याचा प्रयत्न करून, दुसरी नवी पद्धती ठरवावी असा क्रम चालू आहे व ही गोष्ट खरोखर जिवंत शिक्षणपद्धतीचे गमक होय.

> *वाचनाचा आरंभ बालवर्गापासून होतो. वाचनारंभाच्या निरनिराळ्या पद्धती आहेत. चित्रावरून मुळाक्षरांची ओळख, गटपद्धती, शब्दपद्धती, गोष्टपद्धती, प्रसंगपद्धती अशा विविध पद्धतींनी वाचन करता येते. यांपैकी प्रसंगपद्धती विषयीची माहिती सदर लेखात देण्यात आली आहे. हा लेख स्वातंत्र्यपूर्व काळातील असून तत्कालीन ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य सी. रा. तावडे यांनी लिहिलेला आहे. तो पुनर्मुद्रित करण्यात येत आहे.*

### वाचनारंभाच्या निरनिराळ्या पद्धती :

आज ज्या प्रसंगपद्धतीबद्दल लिहिणार आहे, त्या पद्धतीचे स्वरूप कळण्यापूर्वी सध्या चालू असलेल्या व मागे होऊन गेलेल्या वाचनारंभाच्या पद्धती कसकशा निर्माण झाल्या, त्यांच्यात हळूहळू सुधारणा होऊन पूर्वीचे राहिलेले दोष कसकसे घालविण्यात आले हे समजणे जरूर आहे; म्हणून वाचनारंभाच्या ज्या पद्धती होत्या व आहेत त्यांचा ढोबळमानाने थोडा खुलासा करून व त्यांच्या बरेवाईटपणाविषयी थोडा विचार करून, प्रस्तुत विषयाकडे (प्रसंगपद्धतीकडे) वळू, म्हणजे प्रस्तुत पद्धतीचे खरे स्वरूप लक्षात येईल.

**(१) धूळपाटी व मुळाक्षरे :** अगदी तात्या-पंतोजींच्या काळात लाकडाच्या फळीवर धूळ पसरवायची व त्यावर बोटांनी अक्षरे काढावयाची व असे करता करता लिहिण्याच्या साधनाने मुळाक्षरांची ओळख करून दिली जायची. ही ओळख करून देताना स्वर व त्यानंतर उच्चारसादृश्यावरून 'क'वर्ग, 'च'वर्ग इत्यादी शास्त्रीय गट पाडले. खरोखर लेखन म्हणून ही पद्धत आजच्या काळातही चांगली ठरेल; पण वाचनापूर्वी लेखन हा उलटा क्रम या ठिकाणी होता, पण त्या वेळी तो सुलटाच वाटत होता.

**(२) पाटीवर श्रीगणेशाय नमः :** वरील धूळपाटीच्या व या पद्धतीत तत्त्वतः काहीच फरक नाही; फक्त धूळपाटी व धूळ या साधनांच्याऐवजी पाटी व पेन्सिल यांचा उपयोग करण्यात येऊ लागला.

(३) **चित्रांवरून मुळाक्षरांची ओळख :** या पद्धतीपासून नवीन प्रकारचे वळण लागू लागले. लेखनापासून सुरुवात न करता चित्र व त्यावरून चित्राच्या नावातील आद्याक्षर मुलांनी ओळखावे व मग ती मुळाक्षरे लिहावी व गिरवावीत असे करत करत सर्व अक्षरे शिकावयाची; याकरता अंकलिपी व रंगीत चित्रयुक्त तक्ते निघाले. त्यावरून अक्षरे ओळखून घ्यावयाची व निरनिराळ्या शब्दांचे गट वाचून घ्यावयाचे. या गटातील शब्द मुलांच्या परिचयाचे नसले, तरी लहान–मोठ्या शब्दांचे वाचन घेण्यात येई. आता त्या शब्दांच्या याद्या पाहिल्या म्हणजे आश्चर्य वाटते, पण त्या काळी त्यांचे महत्त्व असे. इथपर्यंतच्या काळात प्रथम स्वर व नंतर व्यंजने क्रमाने शिकवली जात व मग क, का, कि, की वळण देण्यात येई.

(४) **गटपद्धती :** यानंतरची पद्धती म्हणजे सरकारी इन्फंट प्रायमरमधील गटपद्धती होय. अंकलिपीप्रमाणे चित्राच्या नावावरून आद्याक्षर ध्यानात ठेवणे हा भाग या पद्धतीत स्वीकारला गेला; पण मुळाक्षरांचा सारखेपणा लक्षात घेऊन रचनेप्रमाणे मुळाक्षरांचे गट पाडून ती शिकविण्यात येऊ लागली. एकेका गटावर वाचावयास थोडथोडे शब्द व पुढे पुढे वाक्ये घातली, तरी पण शब्द व वाक्ये यांचा परस्परांशी संबंध राहिला नसल्याने त्यांचा नीरसपणा कमी झाला नाही; हे 'नमन' वगैरेवरून दिसून येईल. अक्षरांचा सारखेपणा पाहून गट घेतल्याने लेखन सोपे झाले, तरी या गटांतील अक्षरांमध्ये अगदी थोडा फरक असल्यामुळे वाचताना प्रथम प्रथम तरी मुलांचा घोटाळा उडतोच. या प्रायमरमध्ये आणखी विशेष महत्त्वाची सुधारणा म्हणजे मुळाक्षरांना आकार इकार, इत्यादी जोडून त्यांचे वेगळे धडे बनविले. हे धडेही मुलांच्या परिचयातील प्रसंगांचे घेतले आहेत. त्या धड्यांमुळे बाराखडी शिकविण्यात मोठीच सुधारणा झाली. तत्पूर्वी क, का, कि, की असा क्रम असे. सारांश, या गटपद्धतीने बरीच महत्त्वाची मजल मारली यात शंका नाही. हीच पद्धती आज सर्वत्र चालू आहे.

(५) **शब्दपद्धती व वाक्यपद्धती :** गटपद्धती चालू असताना नुसती मुळाक्षरे व त्यांवरून बनणारे अवघड अर्थांचे व अपरिचित शब्द मुलांना नीरस वाटतात, म्हणून चित्र व त्याचे नाव ध्यानात ठेवून त्यावरून सोपी सोपी; पण एकमेकांशी संबंध असणारी वाक्ये वाचून घ्यावयाची, असे कोणाकोणास वाटून, तसे प्रयोग करण्यात येऊ लागले. हे प्रयोग क्वचित ठिकाणीच झाले; पण गटपद्धतीचा पगडा बराचसा बसल्याने व मुळाक्षरांची पहिली पायरी यात नसल्याने, तसेच चित्र, पत्ते, तक्ते वगैरे खटाटोप या पद्धतीत करावयास लागत असल्याने या पद्धतीचा प्रसार झाला नाही.

(६) **गोष्टपद्धती :** अक्षरे व फार तर शब्द, यांवरून वाचनारंभ करणे नीरस व कंटाळवाणे वाटते, असे या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचे मत आहे; म्हणून एखादी सोपी गोष्ट घ्यावयाची, तिच्यात शब्दांची, वाक्यांची पुनरावृत्ती आणावयाची, ती गोष्ट मुलांना सांगून व फळ्यावर वाक्ये लिहून एकदम वाक्ये वाचून घ्यावयाची आणि ती वाक्ये घटवून घेण्याकरता वाक्यांच्या पट्ट्या, पत्ते, चित्रे वगैरेंचे साह्य घेऊन गोष्ट वाचावयास शिकवावयाची. ही पद्धती फारच क्वचित ठिकाणी, विशेषतः मिशनच्या शाळांतून चालत असे. या पद्धतीने ही गोष्ट शिकवून पूर्ण होण्यास २/३ महिने लागत व शिक्षक व मुले घोटाळ्यात पडत; कारण सर्व मुळाक्षरे व त्या प्रत्येकाची बाराखडीची सर्व अक्षरे मुलांच्या ध्यानात राहणे फार कठीण असे व त्यांची

बावरल्यासारखी स्थिती होई; पण घेण्यासारखा भाग म्हणजे गोष्टीतील मनोरंजकता हा होय.

या गोष्टपद्धतीमध्ये सर्व मुळाक्षरे व बाराखड्या आणण्याकरता एक गोष्ट पुरली नाही, तर दुसरीही घेण्यात येते. अशा एक किंवा दोन गोष्टींमध्ये सर्व मुळाक्षरे व बाराखड्या आणणे किती कष्टाचे काम आहे, हे अशा गोष्टी रचून पाहणाऱ्यांच्याच ध्यानात येईल.

या पद्धतीमध्ये मनोरंजकपणा असला, तरी तो ती गोष्ट नवीन असेपर्यंतच राहतो आणि या गोष्टी तर २/३ महिने चालावयाच्या. तेव्हा पुढेपुढे मुले कंटाळत; कारण मुलांना रोज काही तरी नवीन पाहिजे असते.

सर्व मुळाक्षरे ध्यानात राहून त्यांना आकार, इकार जोडण्याची कल्पना या पद्धतीत नसल्याने सर्वच बाराखड्यांची अक्षरे स्वतंत्रपणे ध्यानात ठेवावी लागतात व त्यामुळे मुलांच्या स्मरणशक्तीवर फारच ताण पडतो. इतके करूनही वाक्य, शब्द व त्यांतील अक्षरे असे पृथक्करण झाल्याशिवाय झालेल्या गोष्टीव्यतिरिक्त असे काही वाचता येत नाही.

मात्र ही गोष्टपद्धती खेड्यांतील प्रौढ, पण निरक्षर माणसांस जलद वाचावयास शिकण्यास उपयोगी पडेल, कारण प्रौढ माणसांची शब्द, वाक्ये, त्यातील साम्य, भेद, त्यांचे वर्गीकरण या बाबी ध्यानात ठेवण्याची शक्ती तीव्र असते.

वरील सर्व पद्धतींपैकी गटपद्धतीच सर्वत्र चालू आहे. त्यानंतरच्या पद्धती क्वचित ठिकाणी दृष्टीस पडतात. याशिवाय या पद्धतीच्या थोड्याफार मिश्रणानेही कोठे कोठे वाचन शिकवण्यात येते. त्याला अनुसरून अनेक प्रायमरेही पुष्कळांनी काढली आहेत. गटपद्धती व वाक्यपद्धती यांच्या मिश्रणाने कारखानीस यांनी 'शिशुपाठमाला' हे प्रायमर काढले आहे. त्याचाही हल्ली बराच प्रसार होत आहे; पण त्यातही प्रथमच्या भागात जी वाक्ये निवडली आहेत; ती काही ठिकाणी कठीण शब्दांची, लांबलचक व एकमेकांशी संबंध नसणारी अशी आहेत, हा त्यात दोष आहे. शिवाय मुळाक्षरापासूनच आरंभ झालेला आहे व ती ओळखण्यास एकापेक्षा जास्त चित्रांचा उपयोग केला आहे.

आतापर्यंत प्रचलित पद्धतींची ढोबळमानाने कल्पना आणून दिली. आम्ही ज्या पद्धतीचे स्वरूप सांगणार आहोत ती प्रसंगपद्धती होय. हिच्यात मागील पद्धतींतील दोष टाळण्याचा व सर्वांतील चांगला वाटणारा भाग घेण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि ही पद्धती पूर्णपणे निर्दोष होईल असे मात्र समजू नये; पण प्रयोग करून पाहण्यासारखी ही पद्धती आहे, हे आम्ही पुढे प्रत्यक्ष धडे घेऊन दाखवणार आहोत त्यावरून कळून येईल. धडे घेण्यापूर्वी या प्रसंगपद्धतीत कोणत्या विशेष गोष्टी आहेत व त्यावर कोणते आक्षेप येण्याचा संभव आहे, हे सांगून मग धड्यांना सुरुवात करू.

प्रथम हे स्पष्ट करावयास पाहिजे, की आम्ही जो उपक्रम केला आहे, तो सर्वस्वी नवीन आहे असे मुळीच नाही. आजपर्यंत कित्येकांनी प्रयत्न केलेले आहेत. आम्ही फक्त ठाकठीक रूप देण्याचा प्रयत्न आमच्या प्रॅक्टिसिंग स्कूलमध्ये गेल्या २/३ वर्षांत केला व अनुभव घेऊन, जरूर तेव्हा बदल करून या पद्धतीचे स्वरूप ठरविले आहे. अर्थात मागील सर्व पद्धतींचा आम्ही जरूर तितका अंगीकार केला आहे, हे विसरून चालावयाचे नाही.

**(७) प्रसंगपद्धतीतील विशेष गोष्टी :**

(१) मुले जी भाषा बोलतात, मुलांशी आपण जे नेहमी बोलतो, मुले ज्या गोष्टी नेहमी घरात करतात व जे खेळ खेळतात अशा प्रसंगांची निवड केलेली आहे. हे प्रसंग मुलांच्या नित्य परिचयातील असल्याने गोषवारा समजण्यास फार चांगली मदत होते. त्यामुळे वाक्ये मुलांच्या लक्षात राहतात व शब्दही लवकर समजतात.

(२) प्रसंगांत येणारी वाक्ये एकमेकांशी संबंध दाखवीत असल्याने तुटकपणाचा व रूक्षतेचा दोष जाऊन गोष्टीइतकी पूर्णपणे जरी नाही तरी बरीच मनोरंजकता येते. तसेच निरनिराळ्या वेळी निरनिराळे प्रसंग असल्यामुळे ही मनोरंजकता कायम राहते.

(३) या पद्धतीत अक्षरावरून सुरुवात नसल्याने धडे रूक्ष व कंटाळवाणे होत नाहीत.

(४) अक्षरे, शब्द व नंतर वाक्ये असा क्रम न घेता प्रसंग, वाक्ये, शब्द, अक्षरे व मग मुळाक्षरे असा क्रम या पद्धतीत असल्याने मुलांना भरपूर व्यवसाय मिळतो व ती आपोआप पृथक्करण करून अक्षरांची व बाराखडीची ओळख करून घेतात, मात्र शिक्षकांनी वाक्ये, शब्द व अक्षरे यांचे व्यवसाय भरपूर दिले पाहिजेत.

(५) प्रसंग बहुधा छोटे असल्याने धडा थोडक्यात आटोपतो. त्यामुळे मुलांना कंटाळा येत नाही व गोष्टपद्धतीप्रमाणे विस्तार नसल्याने निश्चित वाक्ये व शब्द मुलांच्या पदरात पडतात.

(६) प्रसंगातील वाक्यांत शब्दांची पुनरावृत्तीही असल्याने ते शब्द मुलांच्या लक्षात चांगले राहतात.

(७) जरूर तेथे चित्रे व त्यापुढे त्यांची नावे असे तक्ते वापरल्याने मुलांना मौज वाटून साहचर्याने शब्द पक्के ध्यानात राहतात. चित्रांचे तक्ते वर्गात टांगून ठेवले, म्हणजे काही दिवसांनी चित्रे नसतानाही त्याचे शब्द मुलांच्या ध्यानात राहू शकतात.

(८) वाचनाची कला चांगली येण्यास व वाचताना अर्थ समजण्यास आरंभापासूनच मदत होते, कारण शब्द व वाक्ये एकदम उच्चारण्याची सवय लागते.

(९) प्रथमपासूनच बाराखडीची अक्षरेही वाचनात येतात. कृत्रिमता जाते व वाचन पुष्कळच सुधारते.

(१०) वाचनाला आरंभ केल्यापासून सुमारे ४/५ आठवड्यांनी झालेल्या शब्दांचे मण्यांच्या व बियांच्या साहाय्याने व्यवसाय करून घेतल्याने पृथक्करणास मदत होते आणि मुळाक्षरे व शब्द ध्यानात राहण्यास चांगली मदत होते. त्यामुळे डोळे व कान यांच्या जोडीला हाताचीही मदत मिळून वाचनाला चांगलीच मदत होते.

यावरून असे दिसून येईल की, (१) गटपद्धतीतील पृथक्करण, (२) वाक्य अगर शब्दपद्धतीतील एकदम वाचण्याची सवय, (३) गोष्टपद्धतीतील मनोरंजकता व व्यवसाय आणि (४) अंकलिपीप्रमाणे चित्रांचा उपयोग या गोष्टींचा मिलाफ थोड्याफार प्रमाणाने या पद्धतीत झालेला आहे.

प्रसंगपद्धतीतील विशेष गोष्टींबरोबर तिच्यातील अडचणींचाही विचार केला पाहिजे.

(१) मुख्य अडचण शिक्षकांना फार मेहनत घ्यावी लागते. प्रसंगांतील वाक्यांचे तक्ते, पत्ते, पट्ट्या, अक्षरे, चित्रे व त्यांचे तक्ते तयार करावे लागतात. पहिल्या वर्षी एकदा मेहनत घेतली, म्हणजे दरवर्षी तशी घेण्याचे कारण पडत नाही. शिवाय कोणतीही गोष्ट मिळविण्यास काहीतरी किंमत द्यावी लागतेच. मुलांची जर सोय पाहावयाची, त्यांना जर हसत– खेळत वाचन शिकवावयाचे, तर शिक्षकांनी ही मेहनत किंमत म्हणून देणे जरूर आहे आणि जुन्या अक्षरपद्धतीत तरी मनोरंजक रीतीने व पद्धतशीर शिकवणाऱ्या शिक्षकांस हा खटाटोप करावा लागतोच की! नाहीतर पाटीवर ग, म, भ, न काढून गिरवा म्हणून सांगणाऱ्यांस जुनी व नवी पद्धती सारखीच!

(२) दुसरी अडचण म्हणजे आरंभी शिक्षकांचा आत्मविश्वास नाहीसा होतो व त्यांची वादळात सापडल्याप्रमाणे स्थिती होते, कारण १०/१२ प्रसंग जरी शिकविले, तरी केव्हा केव्हा मुलांना सर्व अक्षरे निश्चितपणे ओळखता आल्याशिवाय वाटेल तो मजकूर वाचता येत नाही, ही अक्षरओळख होण्यास फारसा उशीर लागत नाही; कारण या पद्धतीत वाचनाबरोबरच वाक्यांचे शब्दांत व शब्दांचे अक्षरात पृथक्करण सुरू असते. मात्र अक्षरांचे पृथक्करण बाराखड्यांच्या खुणांत उशिरा घेण्याची शिफारस आहे. वाचनाच्या धड्यानंतर वाक्य, शब्द, अक्षरे व काही काळाने बाराखडीची घडण असे निरनिराळे पाठ मजेदार रीतीने खेळ म्हणून घेण्यात यावेत; म्हणजे सहज अक्षरओळख होऊन वाटेल तो मजकूर वाचता येण्यास अडचण पडणार नाही. आता प्रत्यक्ष धडे कसे घ्यावयाचे ते पाहू.

**प्रथम मुलांच्या दिनचर्येचे काही प्रसंग घेऊ :**

**प्रसंग पहिला : (सकाळी उठणे)**

**(१) प्रसंग सांगणे :** नाना व बाळ हे दोघे भाऊ आहेत. त्यांना ताई म्हणून एक बहीण आहे. त्यांची आई रोज लवकर उठते व काम करू लागते. तिच्याबरोबर नाना, बाळ, ताई ही मुले उठत असत, पण एके दिवशी त्यांना उठण्यास उशीर झाला म्हणून आई त्यांना उठवू लागली.

**(२) वाक्ये मुलांच्या तोंडी बसविणे :** मुलांना उठवताना आई काय म्हणाली असेल बरे? 'नाना ऊठ; बाळ ऊठ; ताई ऊठ.' ही तीन वाक्ये मुलांच्या तोंडी बसवून घ्यावी व आई काय म्हणाली, ते फळ्यावर लिहिणार आहे, असे सांगून फळ्याकडे लक्ष देण्यास सांगावे.

**(३) फळ्यावर वाक्ये लिहिणे :** वाक्ये तोंडात बसली; म्हणजे एकेक तुटक शब्दांत ती फळ्यावर लिहावी. ते असे –

नाना ऊठ.

बाळ ऊठ.

ताई ऊठ.

प्रत्येक शब्द लिहिता लिहिता आपण उच्चारावा व मुलांनीही फळ्याकडे पाहून तो उच्चारावा.

**(४) नमुन्याचे वाचन :** आपण ती वाक्ये वाचून दाखवावी व मुलांनी आपल्या मागून ती म्हणावी. आपण वाचताना व मुलांनी म्हणताना आपण प्रत्येक वेळी शब्दांवर पट्टी फिरवावी.

**(५) मुलांचे वाचन :** एकेका मुलाकडून एकेक वाक्य वाचून घ्यावे. येथेही शब्दांवरून पट्टी फिरवण्याचे काम केले पाहिजे. या वेळी मधल्या एखाद्या वाक्यावर पट्टी ठेवून मुले बरोबर वाचतात, की नाही ते पाहता येते.

**(६) शब्दांचे पत्ते :** या धड्यांत चार पत्ते करावे लागतात. हे पत्ते खाली पसरावे. पत्ते कसे जुळवावयाचे ते एकदा आपण दाखवावे व मग मुलांना सांगावे. 'नाना ऊठ.' नाना हा शब्द एकाला सापडेल. ऊठ हा शब्द एकाला सापडेल. नंतर ती दोन मुले शेजारी उभी करावी व तयार झालेले वाक्य वाचून घ्यावे.

**(७) तक्ता वाचणे :** फळ्यावरून तक्त्यावर यावे व त्यावरील वाचन फळ्यावरील वाक्याप्रमाणेच घ्यावे व मग तो तक्ता वर्गात टांगून ठेवावा. तो रिकाम्या वेळी मुलांना वाचण्यास सांगावे. मुले असे तक्ते वाचताना आढळतात.

**(८) पट्ट्या व पत्ते :** वाक्यांच्या पट्ट्या व शब्दांचे पत्ते मुलांनी शोधून काढावे. हा भाग फारच मनोरंजक होतो व मुलांना भरपूर व्यवसाय मिळतो.

**(९) पत्त्यांचा खेळ :** शब्द चांगले लक्षात राहण्याकरता हा खेळ उपयोगी पडतो. मुले वर्तुळाकार उभी करावी व प्रत्येकापुढे एकेक शब्दाचा पत्ता टाकावा व तो ओळखून घ्यावा. नंतर मुलांना पळावयास सांगून पुन्हा थांबण्यास सांगावे व पत्ते ओळखून घ्यावे.

■■■

# ‘वाचायला’ शिकवायचे की ‘वाचते’ करायचे?

**प्राचार्य लीला पाटील**
१७, सौरभ, रुईकर वसाहत,
जि. कोल्हापूर.

## अक्षरे, शब्द, वाक्ये : जीवनाची भेट

प्राथमिक शाळेत आल्या दिवसापासून विद्यार्थ्यांवर अक्षरे, शब्द, वाक्ये यांचा नुसता भडिमार होत असतो. सगळी मुळाक्षरे मुलाला शिकवणे – वाचायला, लिहायला शिकवणे हे सर्वांना फार महत्त्वाचे वाटते. पुन्हापुन्हा तीच तीच अक्षरे गिरवून घेण्याच्या चक्रात विद्यार्थ्यांना अडकवले जाते. जीवनापासून मुळाक्षरे तोडून शिकवली गेली, की ते केवळ एक कर्मकांड ठरते. जपमाळ ओढणे आणि ठरावीक अक्षरांचे आकार पुन्हापुन्हा गिरवणे यात फरक तो काय? पण जो विद्यार्थी अर्थपूर्ण शब्दांचा एक भाग म्हणून अक्षर बोलायला, वाचायला, लिहायला शिकेल, तो विद्यार्थी अक्षरांच्या माध्यमातून सतत जीवनाचीच भेट घेत असतो. म्हणूनच ‘ग’ ची गणपतीशी आणि ‘व’ ची वडाशी निरगाठ बांधण्याऐवजी ही अक्षरे ज्यात आहेत, अशा विविध शब्दांशी त्या अक्षरांचा दुवा सांधला, तर कदाचित बंदिस्तपणातून खुलेपणाकडे विद्यार्थ्यांची वाटचाल होईल. अनेक शब्दांत भेटलेले ‘ग’ किंवा ‘व’ जेव्हा त्याला इतरत्र आढळतील तेव्हा विद्यार्थी ‘तो बघ, गणपतीतला ग’ असे न म्हणता ‘तो बघ, तिथे ’ग’ लिहिलाय’ असे म्हणेल; म्हणजेच त्या अक्षरांच्या चित्रांची विशिष्ट ध्वनींशी सांगड घालायला विद्यार्थी शिकला आहे असे मानण्यात येईल. यासंबंधात मध्यंतरी वर्तमानपत्रात आलेला वाचकांच्या पत्रव्यवहारातील मजकूर आठवतो. आदिवासी विभागातील मुलांना शिकवताना ‘ग’ गणपतीचा म्हणण्याऐवजी त्यांना जिथे तिथे दिसणाऱ्या गवतातील ‘ग’ म्हटले तर बरे, असे सुचवल्याचे आठवते.

> *प्राचार्य लीला पाटील या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ होत्या. त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी अनेक प्रयोगशील उपक्रम राबवले. वाचनाच्या प्रक्रियेत अक्षरे, शब्द, वाक्ये यांचे महत्त्व, वाचनक्रम आणि वाचनपाठ यांविषयी त्यांनी केलेले मार्गदर्शनपर लेखन बहुमोलाचे आहे.*

सर्व मुळाक्षरे शिकवून मग स्वरचिन्हांकडे वळायचे असाही काही शिक्षक आग्रह धरतात. अनेक अपरिचित बाबी एकदम मुलांवर आदळू नयेत असा सुज्ञ विचार त्यात नसतो असे नाही; परंतु मूल कसे शिकते याविषयी जॉन होल्ट या प्रसिद्ध विचारवंताने जी मांडणी केली आहे, ती वाचल्यावर असे लक्षात येते, की अवघड सोप्याबद्दलच्या आपल्याला भासणाऱ्या डोंगरदऱ्या मुलांच्या दृष्टीने तशा असतातच असे नाही. जो पदार्थ मुलाला हवा असतो, त्याचे नाव लांबलचक असले किंवा त्या नावात जोडाक्षरे असली, तरी मूल ते म्हणायला शिकते. आईस्क्रीम हा शब्द अलीकडची मुले किती लवकर शिकतात! माझ्या आयुष्यात आईस्क्रीमची भेट फार उशिरा झाली; पण आज वाडीलाल इथेतिथे

भेटत असताना मूल जोडाक्षरयुक्त आईस्क्रीम नुसते तोंडात घालायलाच शिकत नाही, तर तोंडातून बाहेर काढायलाही शिकते! इथे आपण असेही लक्षात घ्यायला हवे, की प्रसंगा-प्रसंगाने (Incidentally) सहजगत्या मुले कितीतरी शिकत असतात. स्वरचिन्हे शिकविणे (उदा., ा, ि, ु ू इत्यादी) महत्त्वाचे आहेच. स्वरचिन्ह वाचायला येण्याने अनेक शब्द वाचण्या-लिहिण्यावर मूल पकड घेते. प्रथमतः फक्त मुळाक्षरे शिकणे (जी शिकताना त्यांचा शब्दांशी, पर्यायाने जीवनाशी संबंध जाणवत नाही.) किंवा त्यानंतर त्या मुळाक्षरांना फक्त स्वरचिन्ह लावायला शिकणे (ज्यांचा जीवनाशी असलेला संबंध मुलांपर्यंत पोहोचविला जात नाही) फार कंटाळवाणे, नकोसे होऊ शकते. अक्षरे, स्वरचिन्हे, शब्द आणि वाक्य यांच्या रूपाने आजूबाजूला दिसणारे, ऐकू येणारे, चाखायला मिळणारे जेव्हा मुलांच्या शिक्षणात प्रवेश करते, तेव्हा मुलाला ते आनंददायक वाटते, शिकावेसे वाटते. एवढेच नव्हे, तर आपल्याला हवे-नको ते सांगण्याचे एक हत्यार आपल्या हातात आले आहे, असे मुलाला वाटते. रुसून बसलेला पहिलीतील सचिन गाल फुगवून दुकानाच्या पाटीवर लिहिलेले 'वडापाव' हे वाचतो आणि त्याबद्दलची आपली मागणी आईकडे नोंदवतो!

**वाचणे : बोललेले, न बोललेले, लिहिलेले :**

वाचणे म्हणजे काय? हा प्रश्न मी पुन्हापुन्हा स्वतःला विचारते. जेव्हा बोललेले आपण ऐकतो आणि समजून घेतो तेव्हा आपण काय करतो? ध्वनी व ओठांची हालचाल यांची सांगड घालून त्यांचे अर्थ मनातल्या मनात वाचतो आणि जे वाचले ते प्रकट करताना तेच ध्वनी व ओठांची तीच हालचाल स्वतः पुन्हा करण्याचा प्रयत्न करतो. येथे हे जे मी लिहिले, ते तुम्हांला पटतेय का? तुम्ही कधी 'मी बोलतोय ते तू वाच' असा शब्दप्रयोग ऐकलाय का? किंवा 'आवाज न करता ओठांच्या हालचालीतून मी जे म्हटले, ते तू वाच' असे कुणी सांगितलेले अनुभवले आहे का? माझे तरी उत्तर नकारार्थीच आहे. मात्र असेही वाचायला शिकणे मुलांना फार आवडते. लिखित लिपीतील चित्रे स्वरयंत्र आणि ओठ यांचा उपयोग करून स्वरबद्ध करणे म्हणजे वाचन असाच आपला सर्वसामान्य विचार आहे; म्हणूनच वाचणे अवघड, की लिहिणे अवघड आणि त्यांपैकी कोणते प्रथम शिकवावे असा तात्त्विक घोळ नेहमी घातला जातो. या दोन्ही क्रिया एकप्रकारे एकमेकांशी निगडित आहेत, हे लक्षात घेऊन शिक्षकाने वाटचाल केलेली बरी.

आपण आतापर्यंत जी चर्चा करीत आहोत, त्यात आणखी एका प्रकाराची भर घालता येईल. मूकाभिनय करून वाचणे म्हणजे तो समजून घेणे व बोलणे. अशा तऱ्हेने जे वाचले ते लिहिणे आणि शब्दबद्ध झालेले लेखन स्वरयंत्र व ओठांच्या हालचालीने अर्थपूर्ण रीतीने वाचणे. शिक्षकाला थोडासा अभिनय जमत असेल, तर मुलांना तो पाहण्यात व तो वाचण्यात मजा वाटते. वाचलेले लिहिणे आणि लिहिलेले वाचणेही त्यांना आवडते. छोटे छोटे प्रसंग मूकाभिनयातून सहज दाखविता येतात. असा एखादा दाखविलेला प्रसंग इयत्ता पहिली-दुसरीतील मुलेही वाचू शकतात, लिहू शकतात आणि लिहिलेले पुन्हा वाचू शकतात. अशा अनेक प्रसंगांवर सृजन-आनंद विद्यालयात काम झालेले आहे. त्यांपैकी एक प्रसंग सूत्ररूपाने पुढे मांडला आहे.

**आजीने आतून अंगणात येऊन वाट पाहणे. दूरवर न्याहाळून बघणे. अपेक्षित व्यक्ती दिसताच आनंद होणे. आलात का? या या या बसा हं. मी तुम्हांला चहा देऊ का? चहा आणणे. हा घ्या. कसा झालाय चहा? छान!**

मूकाभिनयाने सादर केलेला हा प्रसंग पाहिल्यावर काही मुले तो पुन्हा त्याच पद्धतीने करून दाखवू इच्छितात आणि बाकीची काही त्याबद्दलची वाक्ये सांगतात. काही जण चित्रे काढतात आणि इतर काही ती चित्रे पाहून वाक्ये सांगतात. अभिनय पाहून त्याबद्दल बोलणे झाल्यावर खूप मुलांना ते सारे लिहायची इच्छा असते. दोघातिघांनी लिहिलेले इतरांना वाचावेसे वाटते. सर्वांत छान लेखनाचे बक्षीस म्हणजे प्रार्थनेच्या वेळी ते वाचून दाखवले जाणे आणि चांगले वाचता येण्याचे बक्षीस म्हणजे प्रार्थनेच्या वेळी ते वाचायला मिळणे.

### वाचनपाठ लिहायचे कोणी? :

वाचायचे म्हटले, की कोणीतरी काहीतरी लिहिलेले असायलाच हवे असे सर्वसाधारणपणे वाटते. बोललेले वाचणे असा जो प्रकार वर सांगितला, तो फारसा वापरला जात नाही. लिहिलेले वाचायचे म्हटले, की जे लिहायचे ते कोणी? जे लिहायचे त्याचा आशय कोणता? आणि जे लिहायचे ते कशासाठी? असे प्रश्न पडतात. जे लिहायचे ते पाठ्यपुस्तक मंडळाने नेमलेल्या तज्ज्ञांनी. कशासाठी लिहायचे याचे उत्तर तर वरच्या परिच्छेदात आलेच आहे–अर्थात वाचनासाठी! येथे एक मुद्दा तुमच्या लक्षात येतो का बघा. आपण स्वतःला असा प्रश्न विचारूया की, वाचायचे कशासाठी? कोणीतरी लिहिलेले आपण जे वाचले ते केवळ शिक्षकांनी वाचायला सांगितले म्हणूनच? वाचनाचा हेतू केवळ हाच आहे, असे वाटत नाही. वाचन माहितीचे क्षितिज विस्तारण्यासाठी, भावनांची कारंजी आपल्या मनात उमटण्यासाठी, कल्पनांच्या पाखरांची भरारी समजण्यासाठी आणि विचारांची खोली जाणवण्यासाठी असायला हवे. वाचनाचे हे हेतू लक्षात घेतले, तर केवळ तज्ज्ञांनीच लिहावे आणि शिक्षकांनी व मुलांनी वाचावे हे मान्य करायची गरज नाही. ज्या व्यक्तीला मुलाचे आजचे अनुभवविश्व माहीत आहे आणि जिला मुलाच्या भावविश्वाची जाणीव आहे, ती व्यक्ती वाचनपाठ लिहिण्याचा प्रयत्न करू शकेल. तिसरी–चौथीतील मुले पहिली–दुसरीसाठी वाचनपाठ का लिहू शकणार नाहीत? सजग आणि सुशिक्षित पालकही मुलांसाठी वाचनपाठ लिहू शकतील. एवढेच नव्हे, तर एखादा अशिक्षित पालकही लिहायचा आशय तोंडी सांगू शकेल. जूनमध्ये सृजन–आनंद विद्यालयात येणारी बुजरी मुले ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये वाचनपाठ लिहायला लागतात. अळी कशी दिसली? शिरा कसा केला? याबद्दलची त्यांची वाक्ये म्हणजे वाचनपाठ नव्हेत का?

### वाचनाच्या सर्जनशील, आनंददायी वाटा :

गेल्या काही वर्षांतील इयत्ता दुसरीच्या नोंदी पुन्हा चाळताना, वाचणे आणि लिहिणे हातात हात घालून प्रगत झाले आहे असे लक्षात येते. वाचन–लेखनाला गती यावी अशी आकांक्षा असेल, तर खूप लहान लहान तंत्रे परिणामकारकरीत्या वापरावी लागतात. समजा, 'पाऊस' या विषयाशी निगडित असणारे शब्द आपण शोधतो आहोत. मुलांनी पुढील शब्द सांगितले आहेत.

**चिखल, रिपरिप, ओल, निसरडे, गारा, झिमझिम, टपटप, सर, गारवा, स्वेटर, सर्दी, गमबूट रेनकोट, छत्री, गवती चहा, निलगिरी, पांघरूण, धो धो, वारा, गडगड, कागदी नाव.**

हे शब्द सांगताना मुले स्वतःचे अनुभव एक प्रकारे सांगत आहेत आणि इतरांकडून ऐकलेले शब्दही आठवून आठवून सांगत आहेत. शब्द सांगण्याची कमालीची उत्सुकता मुलांना असते. सात–आठ मिनिटांत पंधरा वीस शब्द सांगितले जातात. हे अनुभववाचन झाल्यावर मुलांना पाऊस याबद्दलची जितकी शब्दचित्रे काढून

दाखवता येतील, तितकी चित्रे काढा व त्यापुढे तो शब्द लिहा असे सांगता येईल. हे काम करण्यातही मुले रंगून जातात. लिहिणे अचूक होण्यासाठी शिक्षकांनी फळ्यावर केलेले लेखन उपयोगी पडते. यानंतर कामात किंचित बदल करून थोडे स्पर्धेचे वातावरण निर्माण केले, की मुले आणखी खुलतात. त्यासाठी पुढील स्वरूपाचे प्रश्न विचारता येतील :

(१) फळ्यावरच्या शब्दांत 'ी' खूण किती वेळा आहे?

(२) वरील शब्दांत किती जोडाक्षरे आहेत? ती कोणती?

(३) सगळे शब्द नीट पाहा. कोणती अक्षरे फक्त एकदाच आली आहेत?

(४) ा, ि, े या खुणा कोणकोणत्या शब्दांत सापडतात? ते शब्द सांगा. फळ्यावर लिहिलेले शब्द कोण कोण वाचून दाखवेल? प्रश्न–उत्तरांची जुगलबंदी छान रंगते.

अशा प्रकारची चर्चा होऊन शब्दांचे वाचन झाल्यानंतर तोंडी वाक्ये तयार करायला मुले उत्सुक असतात. मुलांनी सांगितलेली वाक्ये शिक्षकांनी मुलांच्या नावासकट फळ्यावर लिहिली, की मुलांना फार आनंद होतो. पुढील प्रकारची वाक्ये मुलांनी सांगितली आहेत.

(१) धो धो पाऊस पडला, की चिखल होतो. (२) चिखलात खेळायला मला आवडत नाही. (३) घरात बसून टपटप पडणारी पावसाची सर मी पाहतो. (४) पावसात शाळेला जाताना छत्री घेतो. गमबूट घालतो. (५) गार वारा असतो. (६) पावसाळ्यात खूपदा आई गवती चहा करते. मला तो आवडतो.

मुले स्वतःच्या अनुभवकणांना शब्दरूप देत असतात आणि शिक्षक ते शब्द लिपिबद्ध करत असतात. स्वतःच तयार केलेला हा पाठ वाचायला मुलांना फार आवडतो. एवढे काम वर्गात झाले, की प्रत्येक मुलाला पाच–सात वाक्यांचे त्या विषयावरचे लेखन करायला सांगितले, तर कितीतरी पाठ आपोआपच तयार होतात. हे सारे मुलांचे काम वर्गात सतत प्रदर्शित होत राहिले पाहिजे. मुलांनी काढलेले चित्र आणि त्यासाठी त्यांनी लिहिलेला शब्द यांचे तोरण वर्गात लावता येईल. पावसासंबंधीच्या शब्दांची यादी लावू शकू. मुलांनी तयार केलेले वाचनपाठ वर्गात झळकतील. वाचनपाठाखाली मुलाची इयत्ता, नाव व तारीख असेल. शिक्षकांनीही त्याच विषयावर छोटासा वाचनपाठ जरूर लिहावा. इयत्ता दुसरीसाठीचा एखादा वाचनपाठ नमुन्यादाखल वाचूया.

*ढग गडगडू लागले. जोराचा वारा सुटला. आई म्हणाली, ''अरे, सगळे जण आत या.'' मुले म्हणाली, ''छे ! आता गारा पडतील. आम्ही त्या वेचणार आहोत. तुला पाहिजेत का?'' बघता बघता गारा पडू लागल्या. अवि छत्री घेऊन बाहेर धावला. मंदार पातेले घेऊन पळत गेला. भैरवी तशीच पळाली. मंदारने छत्री व पातेले धरले आणि अविने गारा वेचून त्यात घातल्या. भैरवीने फ्रॉकच्या ओच्यातच गारा घातल्या. सगळे जण चिंब भिजले. धावत घरात आले. अंग कोरडे करण्याऐवजी ते गारा खात बसले, आईलाही त्यांनी गारा दिल्या. आई त्यांना म्हणाली, ''आता पुरे, कपडे बदला, डोके कोरडे करा, मी छान गवती चहा करते. आपण सारेजण पिऊ या'.'*

सृजन–आनंद विद्यालयातील मुले आणखीही एका प्रकाराने लिहिलेला वाचनपाठ वाचायला शिकली आहेत. कोणते शब्द असतील याचा अंदाज यावा म्हणून त्याची स्वरचिन्हे लिहिलेली असतात. इयत्ता पहिलीसाठीचा

असा एक छोटासा पाठ वाचूया का?

 **गड– ू ला– ˋ. आता पाऊस पडेल. गा– पड– ील. आपण**  **त गारा वेचू. म – ˋत खाऊ, कागदी**  **पा– त सो ू. मजा क ू.**

गाळलेली अक्षरे, शब्द वाचताना वाचनपाठातील काढलेली चित्रे, स्वरचिन्हे व शब्दात असणाऱ्या एकूण अक्षरांची संख्या लक्षात घेत मुले तो पाठ वाचतात.

**आयुष्य प्रकाशमान करणारे वाचन :**

प्रत्येक अक्षराला त्याचे म्हणून एक व्यक्तित्व असते. काही शब्द एकाक्षरीही असतात, पण सर्वसाधारणपणे योग्य अक्षरांची जुळणी झाल्याशिवाय अक्षरांचा शब्द बनत नाही आणि शब्द बनल्याशिवाय अक्षरांना अर्थ प्राप्त होत नाही; म्हणूनच एकेकाळी अक्षरवाचनावर सर्वत्र आणि आजही काही ठिकाणी असणारा भर कमी व्हायला हवा. शब्दसुद्धा जेव्हा एखाद्या वाक्याचा भाग असतात तेव्हा आपला भर शब्दवाचनावर नसून वाक्यवाचनावर असतो. वाक्यात असणाऱ्या प्रत्येक शब्दाचा आकार वाचत व ध्वनी उच्चारत आपण वाक्यातील दुसऱ्या शब्दाकडे त्याच प्रकाराने जाऊ लागलो, तर वाचनाचा वेग कमी होतोच; पण ते अर्थपूर्णही होत नाही. त्यामुळेच जसा अक्षरवाचनावरचा भर लवकर कमी झाला पाहिजे, तसाच वाक्य वाचताना शब्दवाचनावरचा भर लवकर कमी व्हायला हवा. एका दृष्टिक्षेपात जास्तीतजास्त शब्द पकडण्याची खुबी मुलाला साधली, की ते वाचते होते. वाचायला शिकण्याचा हेतू अमुक एक पुस्तक मुलाला वाचता येणे आणि त्यातील प्रश्नांची उत्तरे मुलाला सांगता/लिहिता येणे हा नसून, त्याला वाचते करणे हा आहे. हा हेतू मनात ठेवला, की रंग, रेषा, हावभाव, सजीवांचे वर्तन, प्रदेश, जंगल, दुर्ग – असे सारे किंवा यांपैकी काही वाचायला शिकण्यासाठी वाचते होणे किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या लक्षात येते. कित्येकदा माणसांच्या गराड्यातही आपण एकाकी असतो. अशा एकाकीपणात वाचन आपली साथ करते. आपल्याला आवडणारी व्यक्ती, हव्या त्या वेळी आपल्याला भेटते असे नाही, पण आपल्याला हवे असणारे पुस्तक आपले असावे म्हणून आपण विकत घेतो (घ्यावे) आणि हवे त्या वेळी पुस्तकरूपाने आपल्याला 'भेटते'. आपण न पाहिलेले अनेक प्रदेश आपण वाचनातून पाहतो. न पाहिलेल्या व्यक्तींशीही वाचनामुळे आपली दोस्ती होते. सुसंस्कृत, समृद्ध जीवनाचा खजिना आपल्यापुढे उघडण्याचा एक मंत्र म्हणजे वाचन. 'तिळा तिळा दार उघड' म्हटल्यावर अलिबाबाला जशी अनेक मूल्यवान वस्तूंनी भरलेली गुहा दिसू लागली, त्याप्रमाणे वाचनातून वाचते होण्याची किमया ज्याने आत्मसात केली त्याला अनेक विषय आणि आशय दिसू लागतात. कविवर्य बा. भ. बोरकर यांनी एके ठिकाणी पाहणे याचा अर्थ 'प्रकाशणे' असा दिला आहे. अक्षरांच्या रेघोट्या आणि शब्दांच्या रचना पाहतापाहता माणसाचे आयुष्य प्रकाशमान व्हावे असा ध्यास असेल, तर शाळाशाळांतून वाचन शिकवण्याचे हेतू व पद्धती बदलायला हव्यात.

■■■

# शाळास्तरावरील वाचन कौशल्य विकास प्रक्रियेचे अनुधावन

**डॉ. राजेश बनकर**
विभाग प्रमुख, मराठी भाषा विभाग
राज्य शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.
भ्रमणध्वनी : ९८५०२५२३८०

> वाचन कौशल्याच्या विकासातील अडथळ्यांचा शोध घेण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमध्ये वाचन कौशल्य विकास प्रक्रिया अनुधावन करण्यात आले. त्यातील निष्कर्ष मांडून, वाचन कौशल्यांचे विकसन करण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवता येऊ शकतात, त्याबाबतची सविस्तर माहिती या लेखात दिली आहे. याचबरोबर वाचन कौशल्याच्या विकसनातील अडथळ्यांचीही चर्चा करून यामध्ये काही उपाय सुचवले आहेत.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेमध्ये वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वाचनातून विविध विषयांचे ज्ञान ते सुलभपणे प्राप्त करू शकतात. यासाठी शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यावर त्यांना वाचायला शिकवले जाते (Learn to Read). विद्यार्थ्यांनी एकदा वाचन कौशल्य संपादन केले, की पुढे मग ते शिकण्यासाठी उत्तम प्रकारे वाचू शकतात (Read to Learn). वाचनाचे हे महत्त्व असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना वाचन कौशल्य प्राप्त होण्यासाठी शाळा स्तरावर सुरुवातीस सुयोग्य पद्धतीने वाचन शिकवणे हे शिक्षकांसाठी अतिशय महत्त्वाचे कार्य ठरते. या कार्यपूर्तीसाठी शिक्षकांनी शाळा व वर्ग स्तरावर वाचनासंदर्भातील विविध अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय स्तरावरून शालेय विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक पाहण्यासाठी राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) मर्यादित कालावधीनंतर केले जाते. काही खाजगी संस्थाही ठरावीक कालावधीनंतर विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक पाहण्यासाठी शैक्षणिक सर्वेक्षण करत असतात (उदा., ASER). निपुण भारत अभियान अंतर्गत पायाभूत अध्ययन सर्वेक्षण (FLS) हे गेल्या वर्षी करण्यात आले. या सर्व सर्वेक्षणांमध्ये भाषेच्या संदर्भात प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य संपादणुकीचे सर्वेक्षण केले जाते. याशिवाय राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तसेच जिल्ह्याचा शिक्षण विभाग यांच्यामार्फत विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर नेमका कसा आहे याची चाचपणी केली जाते. या अध्ययन स्तरांमध्येही भाषेतील वाचन कौशल्य स्तराचा समावेश केलेला असतो.

या विविध अध्ययन सर्वेक्षणांचे निष्कर्ष पाहिले असता, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य संपादणुकीमध्ये विविधता आढळून येते. काही जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांची वाचन कौशल्य संपादणूक ही उत्तम दर्जाची दिसून येते, तर काही जिल्ह्यांमध्ये ती फारशी समाधानकारक दिसून येत नाही. ज्या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची वाचन कौशल्य संपादणूक उत्तम दिसून येत आहे, अशा जिल्ह्यांमधील शाळांमध्ये वाचन कौशल्य विकासासंदर्भात कोणते उपक्रम शिक्षक घेत आहेत, तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये वाचन कौशल्य संपादणूक ही असमाधानकारक आहे, तेथील विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्याचा विकास होण्यामध्ये

कोणते अडथळे आहेत? या प्रश्नांचा शोध घेण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या मराठी भाषा विभागामार्फत 'मराठी वाचन कौशल्य विकास प्रक्रिया अनुधावन' नुकतेच करण्यात आले. या अनुधावन कार्यक्रमासाठी वरील सर्वेक्षणांच्या निष्कर्षांचा विचार करून, राज्यातील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य संपादणुकीचे सरासरी प्रमाण उत्तम असणारे जिल्हे व वाचन कौशल्य संपादणुकीचे सरासरी प्रमाण कमी असणारे जिल्हे यांमधून काही प्रातिनिधिक जिल्ह्यांची निवड या अनुधावन कार्यक्रमासाठी करण्यात आली होती. त्यानुसार कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गडचिरोली, यवतमाळ, जळगाव, अमरावती व नंदुरबार या आठ जिल्ह्यांचा समावेश यामध्ये करण्यात आला होता. सदर जिल्ह्यांतील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील तज्ज्ञ अधिकाऱ्यांद्वारे शाळा भेटींच्या माध्यमातून हे अनुधावन करण्यात आले. शाळा भेट केल्यानंतर वाचन कौशल्य विकास प्रक्रियेची निरीक्षणात्मक माहिती नोंदवण्यासाठी एक 'शाळा भेट प्रपत्र' विकसित करण्यात आले होते. शाळा भेटी करणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत सदर प्रपत्रामध्ये शाळा स्तरावर व वर्ग स्तरावर वाचन कौशल्य विकसनासंदर्भात व अडथळ्यांसंदर्भात जाणवलेल्या बाबी नोंदवण्यात आल्या. प्रत्यक्ष वर्ग निरीक्षण करून व शिक्षकांसोबत चर्चा करून सदर शाळा भेट प्रपत्र भरणेबाबत निर्देश देण्यात आले होते. या आठ जिल्ह्यांतील साधारण ऐंशी शाळांना या कालावधीमध्ये भेटी देण्यात आल्या. जिल्हा स्तरावर या शाळा भेटींच्या माध्यमातून जे शाळा भेट प्रपत्र भरण्यात आले; त्याचे जिल्हा स्तरावर विश्लेषण करून, प्राप्त निष्कर्ष परिषद स्तरावर संकलित करण्यात आले.

या अनुधावन कार्यक्रमाच्या संकलित निष्कर्षांनुसार विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य विकासासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असल्याचे दिसून आले :

(१) प्राथमिक स्तरावर वाचन पूर्वतयारी कृतींचा जास्तीत जास्त उपयोग शिक्षक करत आहेत.

(२) सहभागी वाचन, भाषेतील ध्वनींचे योग्य उच्चारण व सराव, जोडाक्षरयुक्त शब्दांच्या वाचनाचा सराव, प्रकटवाचनाचा सराव इत्यादी वाचन कौशल्य विकास उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

(३) शाळेच्या परिसरात व वर्गामध्ये मजकूर समृद्ध शालेय वातावरण निर्मिती केल्याचे दिसून आले.

(४) वर्गात दोरी ग्रंथालय, वाचन कोपरे, वाचन पेटी यांसारखे उपक्रम शिक्षक राबवत असल्याचे दिसून आले.

(५) मराठी भाषा अध्ययन समृद्धी साहित्य संचातील साहित्याच्या वापराचे योग्य नियोजन व वर्ग अध्यापनात त्याचा सातत्यपूर्ण वापर होताना दिसून आला.

(६) विद्यार्थ्यांसाठी पूरक वाचन साहित्य; यामध्ये वृत्तपत्रे, विविध नियतकालिके, गोष्टींची पुस्तके सुलभ पद्धतीने वाचण्यासाठी उपलब्ध करून दिली जातात.

(७) वाचन कौशल्य विकासास पूरक असे विविध भाषिक खेळ घेतले जातात.

(८) विद्यार्थी शब्दसंग्रह वाढीसाठीचे उपक्रम राबवले जातात. उदा., शब्दभेंड्या, रोज काही नव्या शब्दांचे वाचन-लेखन, गोष्ट सांगणे व त्यावर आधारित गप्पागोष्टी इत्यादी.

(९) परिसरातील उपलब्ध लिखित मजकुराचे वाचन करून घेतले जाते. उदा., गावातील सूचना फलक, दुकानांच्या नावांचे फलक, वस्तूंवरील नावांचे वाचन इत्यादी.

(१०) वाचनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते.

(११) आठवड्यातून एकदा 'वाचन दिवस' साजरा केला जातो. शालेय परिपाठामध्ये वाचनासंदर्भात प्रेरणादायी असे उपक्रम घेतले जातात. उदा., गोष्टीचे वाचन.

(१२) वाचनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहाध्यायींच्या मदतीने वाचन सराव घेण्यात येतो.

या अनुधावन कार्यक्रमाच्या संकलित निष्कर्षांनुसार विद्यार्थी वाचन कौशल्य विकासामध्ये असणारे अडथळे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे :

(१) विद्यार्थांची बोलीभाषा व शिक्षणाची माध्यम भाषा भिन्न असणे.

(२) विद्यार्थ्यांची अनियमित उपस्थिती.

(३) वाचन पूरक शिक्षक–विद्यार्थी आंतरक्रियेचा अभाव.

(४) शालेय वातावरणात मजकूर समृद्ध वातावरणाचा अभाव.

(५) वाचन कौशल्य विकास कसा करावा याची शास्त्रशुद्ध माहिती शिक्षकांना नसणे.

(६) मराठी भाषा अध्ययन समृद्धी साहित्य पेटीतील साहित्याचा वापर प्रभावीपणे केला जात नाही.

(७) वाचन कौशल्य विकासास पूरक उपक्रमांची अंमलबजावणी केली जात नाही.

(८) स्तरनिहाय वाचन साहित्याची उपलब्धता नाही व जे साहित्य उपलब्ध आहे, त्याचा वापर केला जात नाही.

(९) सर्व मुले वाचू शकतील हा विश्वास काही शिक्षकांमध्ये कमी प्रमाणात दिसून आला.

(१०) उपलब्ध आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. वाचन विकासाकरिता विविध ॲप्सचा वापर किंवा अन्य उपायांबाबत शिक्षक अनभिज्ञ आहेत.

वरील अडथळे व वाचन विकास उपक्रमांचा विचार करता, मराठी भाषा वाचन कौशल्य विकासासाठी शाळा स्तरावर पुढील काही उपाययोजना करता येतील :

(१) सुरुवातीस वाचनपूर्व तयारी कृतींचा जास्तीत जास्त उपयोग करणे.

(२) विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा आदर ठेवून त्या भाषेचा स्वीकार करणे, तसेच बोलीभाषा आणि शिक्षणाची माध्यम भाषा यांच्यामधील दरी कमी करणारे उपक्रम वर्गात घेणे.

(३) दोरी ग्रंथालय, वाचन कोपरे, वाचन पेटी यांसारख्या उपक्रमांची अंमलबजाणी करणे.

(४) शालेय ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय यांचा प्रभावी वापर करणे.

(५) मजकूर समृद्ध शालेय वातावरण निर्मिती करणे.

(६) वर्तमानपत्रे, मुलांची नियतकालिके यांचा वाचनासाठी उपयोग करून घेणे.

(७) मुलांचे स्वलेखन दर्शनी फलकावर लावणे, इतर मुलांकडून त्याचे वाचन करून घेणे.

(८) मराठी भाषा अध्ययन समृद्धी संच (पेटी) साहित्याचा प्रभावी वापर करणे.

(९) स्थानिक संदर्भानुसार व विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा वापर करून वाचन साहित्य तयार करणे.

**(पृष्ठ क्र. २७ वर)**

# वाचनछंद कसा जोपासावा?

**डॉ. प्रदीप आगाशे**
पुणे.
भ्रमणध्वनी : ९५४५९४९६५५

औपचारिक शिक्षण सुरू होण्यापूर्वीपासूनच अनौपचारिकपणे मूल शिकत असते. त्यात कळत–नकळत भरपूर ऐकले जाते. ऐकणे, लक्ष देऊन ऐकणे, ते समजून घेऊन ऐकणे हे प्रधान कौशल्य! असे सतत भरपूर वेगवेगळे ऐकले गेले, की दुसऱ्या कौशल्याचा प्रयत्न सुरू होतो. 'बोलणे' हे दुसरे कौशल्य! खरे तर कोणत्याही भाषेबाबत ही दोन कौशल्ये प्राप्त झाल्यानंतर वाचन आणि लेखन ही कौशल्ये येतात. इंग्रजीबाबत लेखन कौशल्यापासूनच आरंभ झाल्याने सारे गणित बिघडले! एकंदरीत काय, तर शाळा सुरू होताच शिक्षणातील वाचन कौशल्य सुरू होते! जोपर्यंत लेखी परीक्षा आणि त्यातही प्रश्न वाचून, समजून घेऊन उत्तर लेखन असा विषय आहे, तोपर्यंत तरी या कौशल्याला शालेय जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'वाचन' या कौशल्याचा आरंभ हा अक्षरओळख, बाराखडी, जोडाक्षरविरहित शब्द, शब्दसमूह आणि वाक्य अशा प्रवासाने होतो; पण वाचन कौशल्याचा पहिला टप्पा आकलनासह वाचन असा आहे. विरामचिन्हांचा अर्थ समजून घेऊन वाचन केल्यास हे आकलन होते. काही लहान मुलांना रस्त्यावरील दुकानांच्या पाट्या वाचण्याचा छंद असतो.

> *'वाचन' म्हणजे काय? त्याची सुरुवात कोठून होते? काय वाचायचे, याबरोबरच ते का वाचायचे? आकलनासह वाचन आल्याने वाचनवेग कसा वाढतो? त्याचा स्वतःला काय फायदा होतो, याबाबतीत पालक काय करू शकतात? शाळा काय करू शकतात? अशा प्रश्नांच्या अनुषंगाने या लेखात चर्चा केली आहे.*

आज कोणत्याही शालेय पाठ्यपुस्तकात आधी मुद्दा पुरेशा स्पष्टीकरणासह समजावून दिलेला असतो. त्यानंतरच त्यावर आधारित प्रश्न असतात. जर या प्रश्नांचेच वाचून आकलन झाले नाही, तर वर्गात काय, गृहपाठात काय किंवा परीक्षेत काय; उत्तरे लिहिता येणे एकूण कठीणच जाणार हे उघडच आहे. आज अगदी दहावीपर्यंतच्या मुलांना गणितातील शाब्दिक उदाहरणे सोडवणे कठीण वाटते. या मागचे कारण 'आकलनासह वाचन' या कौशल्याचा कमकुवतपणा. वास्तविक हे कौशल्य आत्मसात झाले, तर शाळेतील एखाद्या तासाला मूल गैरहजर असले, तरीही त्याचे नुकसान होणार नाही. आकलनासह वाचन कौशल्य आत्मसात झाले, तर स्वतः वाचून, स्वतः विचार करून आणि गरजेसह तशी योग्य कृती करून मुलांना शिकता येते. आकलनासह वाचन कौशल्य आल्यावर दुसरा विषय वाचन वेग! आज मुलांचा अभ्यास हा दुर्दैवाने तासाच्या परिमाणात मोजला जातो; परंतु तो काय आणि किती कळला? कसा कळला? यावरून मोजला जायला हवा. वाचन वेग दुप्पट झाला, तर तेवढाच अभ्यास निम्म्या वेळात होईल. खरे ना! आता हे वाचन कौशल्य, वाचन वेग, हा विषय

जरी खूप महत्त्वाचा असला तरीही त्यासाठी मुलांनीच वाचायला हवे. जसे – बाळूने सायकल चालविण्याचा सराव केला, तर रीमा सायकल चालविण्यात निष्णात होणार नाही, तसेच बाळूने वाचनाचा भरपूर सराव केला, तरीही रीमाचे वाचन कौशल्य, वाचन वेग सुधारणार नाही. यासाठी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे. वाचनाची आवड कशी निर्माण होईल? खालील गोष्टींमुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होते :

(१) सांगितलेल्या, प्रत्यक्ष पाहिलेल्या, अनुभवलेल्या, कोणाकडून तरी प्रत्यक्ष ऐकलेल्या गोष्टी, घटना पुन्हा वाचायला आवडते. त्यात हे सचित्र असेल तर फारच छान!

(२) चित्रमय कथा मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने पूरक ठरतात.

(३) एखादी गोष्ट उत्सुकता वाढेल अशा टप्प्यावर सोडून देऊन, आता पुढे वाचा असे म्हटले तरी मुले कुतूहल म्हणून ती पूर्ण वाचतात.

(४) रामायण आणि महाभारत या दूरदर्शनवरील मालिकांच्या नंतर रामायण व महाभारत या ग्रंथांचा खप लक्षणीय वाढला.

### पालक काय करू शकतील? :

(१) पालकांनी मुलांना वाढदिवसाला अथवा अन्य आनंदाच्या क्षणी पुस्तके भेट दिल्यास मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊ शकते.

(२) ही पुस्तके सहज उपलब्ध झाली पाहिजेत. ती मुलांनी वाचून योग्य जागेवर ठेवावी, अशी अपेक्षा सुरुवातीलाच धरली, तर ती वाचली न जाण्याचीच शक्यता अधिक. मुले सुरुवातीला येता–जाता थोडे थोडेच वाचतील. ती दिवसअखेर जागेवर ठेवण्याचे काम सुरुवातीला तरी पालकांनीच करावे.

(३) या पुस्तकात काय वाचले, ते मुलाला सांगायला लावले तरी त्या निमित्ताने पुस्तक वाचले जाईल आणि मुलाला व्यक्त होण्याची सवयही लागेल.

(४) एखाद्या भागावर प्रश्न तयार करून त्याची उत्तरे शोधण्यासाठी वाचन, असा सहेतूक वाचनाचा प्रयोगही उपयोगी पडतो.

(५) पालकांनी मुलांच्या समवेत रोज काही भागाचे प्रकटवाचन केल्यास, ते मुलांना वाचनाची आवड लावण्यास पूरक ठरते.

(६) मुलांनी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त वृत्तपत्रे, मासिके, वर्तमानपत्रातील जाहिराती असे काहीही वाचले तरी त्याला प्रोत्साहनच द्यावे.

### शाळेत काय होणे अपेक्षित आहे? :

(१) शाळेतील ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी अमुक एक पुस्तक वाचा हे सांगतानाच, ते का वाचा हे स्पष्ट केल्यास मुले पुस्तक वाचतात.

(२) अधिकाधिक पुस्तक वाचन उपक्रम आणि बक्षीस हेही वाचन चळवळीस बळ देते.

(३) पु. ग. वैद्य यांच्या शाळेत मासिके, वृत्तपत्रे पारावर ठेवली जायची.

(४) एच. ए. हायस्कूल, पिंपरी या शाळेने स्नेहसंमेलनातील भोजनात स्वच्छ पान (ताट) स्पर्धा घेतली होती. पान स्वच्छ केलेल्या दोनशेपेक्षा अधिक मुला–मुलींना पुस्तके भेट दिली. यात एकाच वेळी पानात न टाकण्याचा संस्कार ठसविताना वाचन चळवळीसही बळ मिळाले. एकूणच वाचन कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न युद्ध पातळीवर झाला, तरच हे कौशल्य सुधारताना मुले मोबाईलच्या विळख्यातून दूर होतील.

■■■

# ज्योत दिव्यत्वाची

**डॉ. जगराम भटकर**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार.
भ्रमणध्वनी : ९४२३७२८४८६

शिक्षक संवाद हा माझा नित्याचा प्रवास. या प्रवासात अनेक अनुभव येतात व या अनुभवांची देवाणघेवाण हे तसे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे कामच. NEP अंतर्गत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान यांवर लक्ष केंद्रित करून सध्या संस्थेचे काम सुरू आहे. शिक्षणातून माणूसपण जपले जावे, हे आपल्या शिक्षण प्रक्रियेचे दायित्व! आपल्या सर्वांवर ही समाजाने टाकलेली जबाबदारी !

गेल्या दोन महिन्यात FLN (मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान) आधारित पंचतारांकित शाळाभेटीचा कार्यक्रम आम्ही सर्वांनी घेतला. त्यामागे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची प्रेरणा होती. शाळाभेट ही मूलभेट ठरावी, या आनुषंगाने प्रत्येक मुलाशी संवाद साधण्याची संधी मिळाली. गुणवत्तेबाबत पालक, गावातील पदाधिकारी व शिक्षक मित्रांशीसुद्धा चर्चा झाली. यामध्ये शाळा हा एकात्मिक घटक म्हणून आम्ही गुणवत्ता आनुषंगिक पडताळणी केली. या शाळाभेटीत बऱ्याच शैक्षणिक बाबी आमच्या लक्षात आल्या. या सर्वांमध्ये सर्वांत प्राधान्याची बाब म्हणजे वाचनातून घडणारे विद्यार्थी चैतन्य!

माणूसपण म्हणजे चांगल्या गुणांचे एकत्रीकरण; परंतु त्यासाठी चांगल्या गुणांची, चांगली उदाहरणे समोर असायला हवीत. मूल त्याच्यासमोर असलेल्या चांगल्या उदाहरणांमधून स्वतःची जाणीव विकसित करून चांगल्या बाबी निवडते व त्यांचा संच बनून एक चांगला माणूस समाजात निर्माण होतो. ही एक प्रक्रिया आहे व अशी सर्व चांगली उदाहरणे बघण्याची संधी ज्या शाळेत, ज्या शिक्षकांकडून मुलांना मिळते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी चांगली होते. भविष्यातील व्यक्तिमत्त्वाची गृहीतके तयार होतात, जी पुढे आयुष्यात बदलणे अवघड होऊन बसते. गृहीतक निर्मितीची ही सर्व प्रक्रिया आम्हांला आमच्या शिक्षक मित्रांकडून शिकायला मिळाली. या प्रक्रियेतील मैलाचा दगड म्हणजे विद्यार्थ्यांना शिक्षणाद्वारे वर्गात, शालेय परिसरात व घरीदेखील उपलब्ध करून दिलेली वाचनाची संधी होय.

> *'वाचन' हे मानवी व्यक्तिमत्त्वावर दीर्घकालीन आणि उपयुक्त परिणाम करणारे साधन आहे. चांगल्या ग्रंथांचे वाचन करून विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये आणि इतरांमध्ये, तसेच समाजामध्ये महत्त्वाचे बदल घडवून आणल्याची अनेक उदाहरणे आहेत. या बाबतीतील अनेक उदाहरणे प्रस्तुत लेखात दिली आहेत.*

वाचनाची सवय ही व्यक्तिमत्त्व निर्मितीमधील एक महत्त्वाचा दुवा आहे. संस्कार, सद्गुण यांचे ते प्रवेशद्वार आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण अगदी डोळ्यांत भरते, म्हणून तर समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे. 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचित जावे' अर्थात वाचनाने आयुष्य अनुभव समृद्ध होऊन, संवेदनशील व संस्कारी व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होते हे सर्वमान्य आहे, मात्र याचा जेव्हा प्रत्यक्ष आमच्या कामामध्ये आम्हांला स्वतःला अनुभव आला, तेव्हा खऱ्या अर्थाने वाचन

सामर्थ्याविषयी विचार मांडण्याचे साहस निर्माण झाले. शाळेमध्ये छोटीछोटी पुस्तके असतात. या पुस्तकांद्वारे संपूर्ण भारताचे भविष्य घडविण्याची कला आमच्या शिक्षक मित्रांमध्ये आहे, याचा आम्हांला प्रत्यय आला. जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी काम करताना 'ग्यानप्रकाश फाउंडेशन' या संस्थेचेदेखील सहकार्य मिळत आहे. वस्तुत: शाळाभेटीची प्रवास मांडणी या लेखात सयुक्तिक होणार नाही; परंतु काही मोजकी उदाहरणे महत्त्वाची ठरतील. जि. प. प्राथमिक शाळा सुंदरदेपाडा, राजमोही लहान, जळखे, खांदेपाडा यांमध्ये काम करणाऱ्या माझ्या सर्व शिक्षकांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. आपण जर जागतिक कीर्तीच्या व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास केला, तर त्यांच्यावरील वाचन संस्कार प्रथमदर्शनी लक्षात येतो. वाचनाने माणूस घडण्याची प्रक्रिया जलद व यशस्वी होते, म्हणून वाचन हा केवळ एक संस्कार नसून, व्यक्तिमत्त्व विकासाकडे वाटचाल आहे. यामुळे वाचनाकडे केवळ कौशल्य म्हणून पाहणे हा तसा तोकडा विचार वाटतो; परंतु वाचन कौशल्यामुळे वाचनाचे दालन खुले होते, हे तेवढेच महत्त्वाचे आहे. वाचन कौशल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शाळेमध्ये असणारी संस्कार पुस्तके, नेतृत्व करणाऱ्या, तत्कालीन समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची चरित्रे, देशोदेशीच्या रंजक लोककथा, कवितांचा संग्रह यांचे वाचन केल्यामुळे मूल कसे तयार होते, याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला व वाचनाच्या ताकदीची आमची वैज्ञानिक जोडणी झाली.

- मनावरचा ताण ही जागतिक समस्या तर आहेच, शिवाय अनेक मानसिक रोगांचे मूळ पण आहे; परंतु इयत्ता पहिलीतील आमच्या एका विद्यार्थिनीला वर्गशिक्षकांनी लावलेली वाचनाची आवड तिला वेगळ्या आनंदी विश्वात घेऊन गेल्याचे उदाहरण आहे. सर्व काही विसरून अगदी भान हरपून वाचणारी मुले अगदी स्वतःपुरती मर्यादित न राहता वाचनाद्वारे गावात तणावमुक्त संदेश देताना दिसतात.
- एकाग्रता सध्या फार महत्त्वाची झाली आहे. एकाग्रता नसली, की व्यक्ती कामापासून दूर जाते. आत्मविश्वास कमी होतो आणि सन्मानदेखील गमावला जातो. इयत्ता चौथीतील गायत्री आपल्या वाचनावर लक्ष केंद्रित करून राजमोही गावामध्ये सर्वांची लाडकी बनते; तेव्हा लक्षात येते, की वाचनाने फोकस स्कील निर्माण होते. समजपूर्ण जीवनाचे शिक्षण मिळून सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधले जाते व आपल्या व्यक्तिमत्त्वाला आदर प्राप्त होतो.
- इयत्ता चौथीमधील विद्यार्थी सतत पुस्तकांचे वाचन करून नवीन लेखन करू लागतात याचा अर्थ, तोचतोचपणा घालवून नवी ऊर्मी निर्माण करण्याचे काम वाचन करते.
- जीवन हे सुखदुःखाच्या धाग्यांनी विणलेले असते. त्याला जीवनाचा एक भाग मानून आनंदी राहणे हे कौशल्य आत्मसात करता येते. इयत्ता चौथीमधील एक विद्यार्थी वाचनातून स्वतःकडे बघू लागतो, स्वत:मध्ये चांगल्या सवयी विकसित करून संवादरूपाने त्या सवयी आपल्या मित्रांमध्ये, गावकऱ्यांमध्ये रुजवतो. वाचन अनुभवातून स्वतःही आनंदी राहतो व दुसऱ्यालाही आनंदी करतो.
- इयत्ता चौथीतील एक विद्यार्थिनी जेव्हा आपल्या वाचन सामर्थ्याने प्रगल्भ होऊन आपल्या शाळेतील सर्व वातावरण चांगल्या सवयींनी युक्त बनवते, तेव्हा तिला प्राप्त झालेल्या वाचन कौशल्यातून ज्ञानवृद्धीच्या मार्गाचा तिचा हा प्रवास तिला शाळेमध्ये प्रतिष्ठा प्राप्त करून देतो, अर्थातच वाचन कौशल्याने इतरांवर आपली छाप पाडण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

- लोकशाहीमध्ये जशी वेगळी मते, वेगळे प्रवाह आवश्यक असतात, तसे एकात्मतेसाठी एकमत व सार्वत्रिक भाव खूप गरजेचा असतो. वाचनाद्वारे आकलन क्षमतेचा विकास होतो. सत्य व असत्याची जाण येते. इयत्ता चौथीतील शांत व संयमी स्वभावाची एक विद्यार्थिनी आपले विचार सर्वांना पटवून देते.
- वाचनाने व्यक्तीच्या मानसिक क्षमतांचा विकास होतो. मानसिक क्षय कमी होऊन चांगल्या बाबी लक्षात राहतात. धारणेचा विकास होऊन न्यूरॉनचे योग्य कनेक्शन तयार होते. व्यक्ती जीवनाबद्दल आशावादी बनते. राजमोही या गावातील या मुलांनी चांगल्या संस्कारक्षम गोष्टींचे वाचन करून, गाव व्यसनमुक्त करण्यात पुढाकार घेतल्याची बाब समोर येते. या ठिकाणी वाचन हे आशावादी न्यूरॉनचे कनेक्शन बनवते व नकारात्मक परिस्थितीत जगण्याचा अनुभव समृद्ध करते याचा प्रत्यय येतो. मन रिकामे ठेवणे वाईट असते. वाचनाने वैचारिक सामर्थ्य निर्माण होऊन मनाचे घातक आजारापासून संरक्षण होते. विचारसाखळी निर्माण होऊन व्यक्ती स्वतःच्या जीवनाचा विकासमार्ग निर्माण करते व रिकाम्या वेळेचा उपयोग जीवन घडवण्यासाठी करते.
- येल नावाच्या विद्यापीठातील अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे, की रोज ३० मिनिटे वाचन केल्याने व्यक्तीचे आयुष्य वाढते. वाचनाने जीवनाला आवश्यक असणारी ऊर्जा निर्माण होते. व्यक्ती विविध छंदांची जोपासना करते. यांद्वारे विविध जीवनकलांची वेचणी करून, दुसऱ्यालादेखील आपल्या समृद्ध संस्कृती वारशातून प्रेरणा देते.
- विचारशक्ती व विचार दारिद्र्य ही दोन्ही टोके माणसाला जीवनात परमोच्च स्थळी किंवा रसातळी पोहोचविणाऱ्या संकल्पना आहेत. वाचनाद्वारे विचारशक्तीचा विकास होऊन वेगवेगळ्या विविधांगी प्रश्नांना सामोरे जाण्याची शक्ती निर्माण होते. पूर्वग्रह दूर होऊन वस्तुनिष्ठ विचार क्षमतांचा विकास होतो. सुंदरदेपाडा शाळेतील मुले आपल्या शाळेतील आपल्या शिक्षकांची, आपल्या मित्रांची काळजी घेतात, सोपविलेली सर्व कामे पूर्ण करतात. खोटे बोलणेदेखील मुलांनी सोडून दिले आहे. गावात प्रामाणिक पिढी निर्माण होताना दिसत आहे. मुले शाळेतील गुणवत्तेचा विचार करून स्वतः एकमेकांना शिकवतात व या मुलांबद्दल गावकऱ्यांमध्ये एक प्रकारचा आदर निर्माण झाल्याची बाब वाचन सामर्थ्याने कशी घडली हे प्रकर्षाने लक्षात येते.
- आपल्या मेंदूला कायम काम हवे, त्याला सतत नवनवीन मानसिक आव्हाने लागतात; तेव्हाच मेंदू चांगला ताजातवाना राहतो. हा मेंदूचा व्यायाम वाचनामुळे होतो. वाचन कौशल्य आले, की व्यक्ती अधिकाधिक वाचत जाते. तसतशी तिच्या मेंदूची क्षमता वाढत जाते.

वरीलप्रमाणे व्यक्तिमत्त्व विकास व वाचन यांचा संबंध आम्ही शाळाभेटीतून शिकलो व हे सर्व वाचनसंस्कार जर आमचे शिक्षक करू शकतात, तर आपण सर्व जण करू शकतो, यात शंका नाही. आज जगापुढे ज्या मानवी समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या पाहून प्रश्न पडतो, की माणसाचे स्वास्थ्य टिकून राहते की नाही. अशा वेगवेगळ्या समस्यांवर वाचन हा इलाज सर्वांत महत्त्वाचा वाटतो; म्हणून वाचन हे केवळ कौशल्य नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासाचे द्वार आहे, या दृष्टीने त्याकडे पाहायला हवे.

# 'दृक्-साक्षरता'

**डॉ. चित्रा सोहनी**
पुणे.
भ्रमणध्वनी : ९८८१६१५०८१

'वाचाल तर वाचाल' असे म्हटले जाते; पण वाचन म्हणजे केवळ लिखित साहित्याचे वाचन असा मर्यादित अर्थ घेणे योग्य होणार नाही. ज्याला लिहिता-वाचता येते त्याला 'साक्षर' म्हटले जाते; परंतु Visual Library म्हणजे 'दृक्-साक्षरता' ही सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे.

*लहान मुलांना वाचन शिकवण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी म्हणून चित्रवाचनाचा सराव घेणे आवश्यक आहे. चित्राचा आकार, रंग, परस्परसंबंध, अंतर या बाबी चित्रवाचनातून कळतात. याचे आकलन होणे म्हणजेच दृक्-साक्षरता. त्याचा शिक्षकांनी अधिक जाणीवपूर्वक विचार करावा. यासाठीचा मार्गदर्शनपर लेख.*

दृक्-साक्षरता म्हणजे नेमके काय? तर प्रतिमा, चित्रे, रंग, आकार, चेहऱ्यावरील भाव यांचे योग्य वाचन करता येणे. खरे तर अगदी जन्मापासून ही कला असते, पण तिचा योग्य विकास करणे आवश्यक आहे. लहान बाळाला आई हसते आहे, की रागावली आहे हे समजते. त्यानुसार ते प्रतिसाद देतेच.

एकदा आम्ही परगावी गेलो होतो. तिथे स्थलदर्शन करून, गाड्या जिथे लावल्या होत्या, तिथे आलो. तिथे असंख्य गाड्या होत्या, पण छोट्या तीन वर्षांच्या राहुलने आपली गाडी लगेच ओळखली; खरे तर त्याला नंबरप्लेट वाचता येत नव्हती, पण गाडीचे रंगरूप आणि नंबरची दृक्-प्रतिमा त्याच्या मनात ठसली असणार. ही दृक्-साक्षरताच आहे.


मुलांना औपचारिकरीत्या वाचन शिकवण्यापूर्वी चित्रवाचनाचा सराव देणे उपयुक्त ठरते. चित्रवाचनातून वेगवेगळे आकार, रंग, त्यांच्यातील परस्परसंबंध, अंतर अशा अनेक गोष्टी कशा समजावून घ्याव्यात हे लक्षात येते. चित्रातील प्रसंग, वस्तू, व्यक्तींच्या हालचाली यांवरून त्यांची कामे, चेहऱ्यांवरील भाव यांबद्दल वेगवेगळे प्रश्न विचारून मुलांशी संवाद साधला, तर या दृक्-प्रतिमांचे बारकाईने निरीक्षण करण्याचे कौशल्य वाढीला लागते. याचा सराव झाल्यावर अक्षरवाचन सुलभ होते. नाहीतरी अक्षरवाचनात अक्षरांचे आकार, त्यातील सारखेपणा आणि फरक हेच तर लक्षात येणे आवश्यक असते.

मात्र वाचता यायला लागल्यावर हे दृक्- प्रतिमांचे वाचन थांबता उपयोगी नाही. बहुतेक वेळा पहिली-दुसरीपासूनच पुस्तके मिळाली, की पालक त्यांना वेष्टण घालतात. पुस्तके फाटू नयेत यासाठी घेतलेली ती काळजी असते, पण पुस्तके तयार करणाऱ्यांनी योग्य चित्रकाराकडून मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ विचार करून तयार करून घेतलेले असते. मुलांनी पुस्तक हातात येताच प्रथम चित्रवाचन करून पुस्तकात काय वाचायला मिळणार याबद्दलची त्यांची उत्सुकता वाढावी, गोडी निर्माण व्हावी असा उद्देश त्यामागे असतो; परंतु पालकांना याची कल्पनाच नसते. इतकेच काय अनेक शिक्षकांनाही याची योग्य जाणीव नसते. पहिली-दुसरीच्या मुलांना सहज विचारून पाहिले, तर ही चित्रे बाईंनी/गुरुजींनी आम्हांला दाखवलीच नाहीत अशी उत्तरे मिळतील.

मुखपृष्ठाबरोबरच पाठांमध्येही अनेक चित्रे, फोटो, नकाशे, आकृत्या, आलेख असतात. शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रथम या दृक्–प्रतिमांचे निरीक्षण करायला, त्यांचे अर्थ लावायला शिकवणे आवश्यक आहे, अन्यथा बहुतेक मुले हा भाग वगळून केवळ मजकूरच वाचतात.

दृक्–प्रतिमा का वाचाव्यात, याची काही कारणे आहेत. अक्षरे, शब्द अमूर्त असतात. त्यामुळे त्यांचा अर्थ लावणे थोडे अवघड असते. नुसते शब्द लक्षात राहणेही त्यामुळे कठीण असते. शब्दांना अर्थ केव्हा प्राप्त होतो? तर ते शब्द या वस्तूंसाठी, व्यक्तींसाठी व कृतींसाठी वापरले आहेत ते लक्षात आले, तर त्या शब्दांना अर्थ प्राप्त होतो. निरर्थक शब्द तर मुळीच लक्षात राहत नाहीत, पण दृक्–प्रतिमांचे तसे नसते. फोटो, चित्रे मूर्त असतात. त्यांचा अर्थ लगेच समजतो. मग त्यांचे वर्णन करण्याची सवय लावली, तर त्यांच्याशी संबंधित मजकूर लक्षात राहणे सुलभ होते.

चित्र अथवा आकृती पाहण्याचे/वाचण्याचे कौशल्य वाढवायचे म्हणजे नेमके काय करायचे? मुलांना चित्रे किंवा आकृती पाहा असे म्हटले, तर म्हणतील 'हो पाहिली आकृती'; पण ती समजून घेण्याची सवय लावण्यासाठी शिक्षकांनी त्यावर विचार करायला संधी द्यायला हवी. एक साधेसे उदाहरण घेऊया. एखाद्या रोपाचे चित्र विज्ञानाच्या पुस्तकात असते. त्यावर कोणते प्रश्न विचारायला हवेत बरे! रोपाचा कोणता भाग जमिनीच्या वर असतो? तू कसे ओळखलेस? यावर जमीन चित्रात कशी दाखवली आहे, हे मूल पाहील. मग खोडाला फांद्या कोठे आहेत?



फांद्यांना पाने कशी चिकटली आहेत? रोपाला फांद्या का आवश्यक आहेत? फांद्या नसत्या तर काय झाले असते? मुळे कोठे आहेत? मुळे खाली जमिनीतच का बरे असतील? मुळाला पुन्हा उपमुळे फुटून पुन्हा ती बारीक बारीक का दाखवली आहेत? त्याचा रोपाला काय फायदा होत असेल? यांसारखे विविध प्रश्न विचारून चित्र नुसते पाहायचे नसते, तर निरीक्षणावरून तर्क करायचा असतो याची जाणीव नकळत विकसित होते.

याप्रकारे चित्रवाचनामुळे मुले स्वतः रोपाचे चित्र काढतानाही त्याचे बारकावे नकळत काढतीलच. भाषेच्या पुस्तकात प्रसंगचित्रे असतात. या प्रसंगचित्रांचे योग्य निरीक्षण करून त्यावर चर्चा झाली असेल, तर पाठातील प्रसंगही लक्षात राहायला मदत होईल.

चित्रांच्या तुलनेत आकृत्या थोड्या अमूर्त असतात. विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात इंद्रियांचा उभा छेद, आडवा छेद दाखवलेला असतो हे समजून घेणे अनेक मुलांना अवघड जाते. यासाठी काही वस्तू/फळे वर्गात आणून उभा छेद कसा दिसेल, आडवा छेद कसा दिसेल याचे प्रात्यक्षिक मुलांकडून करून घेतले, तर आकृती समजावून घेणे थोडे सोपे होईल. वस्तू वेगवेगळ्या बाजूंनी पाहिल्या तर कशा दिसतील, याचेही प्रात्यक्षिक वर्गात तसेच चित्रकलेतही करायला हवे.

गंमत म्हणून एकदा एका कार्यशाळेत हत्तीचे चित्र वेगवेगळ्या बाजूंनी काढण्याचा सराव घेतला. बाजूने, पुढून, मागून, वरून या प्रकारच्या सरावाचा मुलांना फायदा झाला. विज्ञानातील आकृतीत एखादाच भाग पुन्हा मोठा करून दाखवलेला असतो. तसेच हे भाग समजण्यासाठी वेगवेगळे रंग दिलेले असतात. प्रत्यक्षात अवयवांना, अंतर्भागांना असेच रंग असतील असे नाही, हेसुद्धा स्पष्ट करणे आवश्यक आहे.

# वाचन संस्कृती आणि मी

**अविनाश हळबे**
सी २३, स्वरांजली,
शिवतीर्थनगर, कोथरूड, पुणे.
भ्रमणध्वनी : ९०११०६८४७२

*वाचनाचे व्यक्तिगत आणि समाजाच्या दृष्टीनेही फायदेच फायदे आहेत. हे सांगत असताना लेखकाला स्वत:ला वाचनाचा कसा फायदा झाला, आपण लेखक कसे झालो, वक्ता कसे झालो, या संदर्भातील माहिती या लेखात दिली आहे. मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न करणे किती आवश्यक आहे, याचा ऊहापोह या लेखात केला आहे.*

वाचनाची उपजत आवड फार कमी लोकांमध्ये असते, परंतु ती आवड आपल्यामध्ये रुजवता येते. यासाठी प्रथम आपल्या आवडीचे वाङ्मय, त्यानंतर संबंधित विषयांवरील साहित्य आणि आपली वाचनाची बैठक थोडीफार पक्की झाल्यानंतर, आपल्या आवडीनुसार अनेक विषयांवरील वाचनाचा आस्वाद घ्यावा. यासाठी आपले कुटुंबीय, शिक्षक इत्यादींचे मार्गदर्शन नक्कीच उपयोगी पडते. एकदा गोडी लागली, की आपल्या ज्ञानभांडाराला कोणत्याच मर्यादा राहत नाहीत. ते सर्वस्पर्शी, सर्वदर्शी आणि सर्वसमावेशक होते, ज्याचा आपल्याबरोबर समाजालासुद्धा खूप फायदा होतो.

याबाबत माझा अनुभव फारच बोलका आहे. बालपणी माझ्या घरातील वातावरण अवांतर वाचनास पूर्णपणे अनुकूल असल्यामुळे, वडिलांनी वर्गणी भरून घराजवळचे एक ग्रंथालय उपलब्ध करून दिले होते. आम्ही सर्व भावंडे येथून मासिके/पुस्तके घरी आणून वाचत असू. शाळेमधील पुस्तकपेटी आणि इतर काही वाङ्मय मिळाले, तर मी ते अधाशासारखे वाचत असे. इतकेच काय, तर बागेत गेल्यावर भेळ खाल्लेल्या कागदावरचेही मी वाचत असे. माझी वाचनाची आवड यातून जोपासली गेली.

पुढे नोकरीला टाटा मोटर्समध्ये असताना बसने जायला यायला एकेक तास वेळ लागे. मी पहिल्या दिवशी बसमध्ये बघितले, तर क्वचित कोणी वर्तमानपत्र वाचत होते, तर बाकीचे गप्पा आणि झोप यात रममाण झाले होते. या वेळेचा मी हिशेब काढला. मी वयाच्या पंचविसाव्या वर्षी नोकरीला लागलो आणि साठाव्या वर्षी रिटायर्ड होणार आहे. मग या ३५ वर्षांमध्ये मी एकूण किती वेळ बसमध्ये रिकामा बसणार आहे? सुट्ट्या/रजा वजा केल्या, तरी हा वेळ अडीच वर्षे इतका भरला! मग या रिकाम्या वेळेचा उपयोग वाचनासाठी का करू नये, या हेतूने मी कंपनीच्या आणि बाहेरच्या ग्रंथालयाचा सभासद झालो आणि बसमधून जाता-येताच्या वेळांत वाचन सुरू केले. मला सांगायला अभिमान वाटतो, की माझ्या ३५ वर्षांच्या सेवाकाळात ३५ दिवससुद्धा असे नसतील, की ज्या दिवशी माझ्या हातात पुस्तक नव्हते! याबरोबरच आवडलेले पुस्तक मी बसमधल्या इतर सहकाऱ्यांनासुद्धा आवर्जून वाचायला देत असे. या विविध विषयांवरील वाचनाने माझे ज्ञानविश्व सर्व बाजूंनी समृद्ध होत गेले.

याच काळात मी माझी शैक्षणिक पात्रता वाढवण्यासाठी प्रथम डी.बी.एम. आणि त्यानंतर

एम.बी.ए. करण्यासाठी सायंकाळचे कॉलेज जॉईन केले. वाचन/अभ्यास करण्यासाठी बसमधल्या वेळेचा उपयोग केला; जेणेकरून मी या दोन्ही परीक्षा उत्तम गुणांनी पास झालो. हाही एक मोठा फायदा.

या वाचनसमृद्धीच्या जोरावर मी कंपनीच्या निरनिराळ्या विभागांमध्ये होणाऱ्या कथा, कविता, घोषवाक्ये, निबंध, भित्तिपत्रके इत्यादी स्पर्धांमध्ये भाग घेऊन सातत्याने प्रथम क्रमांकाची बक्षिसे मिळवली.

लहानपणी वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतल्यामुळे माझ्यात सभाधीटपणा होताच; त्याचा आणि माझ्याकडे जमा झालेल्या ज्ञानभांडाराचा उपयोग करून, मी निरनिराळ्या संस्था आणि मंदिरांमध्ये धार्मिक आणि इतर अनेक विषयांवर व्याख्याने देण्यास सुरुवात केली. अनेक विषयांचा अभ्यास आणि पुण्यातील अनेक संस्थांमध्ये नामवंतांची व्याख्याने ऐकली असल्यामुळे आलेली बहुश्रुतता; यांमुळे माझी व्याख्याने नुसतीच मनोरंजक नव्हे, तर अभ्यासार्थींना विविध माहिती देणारी पण होत असत.

या अनुभवविश्वाला लेखनाची जोड देऊन मी निरनिराळी वर्तमानपत्रे, मासिके यांत अनेक विषयांवर लेखन सुरू केले. याबरोबरच माझे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यातील कथांना बक्षिसे तर मिळालीच, पण एक कथा महाराष्ट्र शासनाने इयत्ता १२वीच्या पाठ्यपुस्तकात घेतल्याने, मी २०१३ ते २०२० या काळात ‘लेखक आपल्या भेटीला’ हा उपक्रम महाराष्ट्रातील ज्युनिअर कॉलेजमध्ये राबवला, ज्याचे ४५०च्या वर कार्यक्रम झाले. या कार्यक्रमात मी विद्यार्थ्यांना वाचनासाठी उद्युक्त करण्याबरोबर, कॉलेजमधील नवीन उपक्रमांची माहिती घेत असे. त्यामध्ये मुंबईच्या शैलेंद्र कॉलेजातील प्राचार्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी सुरू केलेल्या ‘पालक वाचन कट्टा’ या उपक्रमाविषयी माहिती दिली.

स्वामी विवेकानंदांच्या वचनाप्रमाणे ‘राष्ट्रनिर्मितीचे कार्य कोणतेही कायदेकानून अथवा पार्लमेंट करू शकत नाही, ते काम फक्त तीन लोक – म्हणजे आई, वडील आणि शिक्षकच करू शकतात’ हे जाणून त्यांनी संस्थाचालकांच्या पाठिंब्याने प्रथम पालकांना वाचते करण्यासाठी, सभांमधून पालक प्रतिनिधी आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या साहाय्याने या उपक्रमाचे महत्त्व पटवून दिले. याबरोबर आठवड्यातून एक दिवस ग्रंथालयामध्ये पालकांना वाचन करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली गेली. अशी पूर्वपीठिका तयार झाल्यावर दि. १५ जानेवारी, २०१७ रोजी ‘पालक वाचन कट्टा’ या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यामुळे पुढील प्रत्येक शनिवारी अनेक पालक शाळेत येऊन निरनिराळ्या पुस्तकांचे वाचन करू लागले. त्यांना शिक्षक आणि ग्रंथपाल उत्तम मार्गदर्शन करू लागले. काही काळाने इतर वारीपण दिवसभर पालकांना ग्रंथालयाची सुविधा दिली गेली.

याचे पुढचे पाऊल म्हणजे पालकांनी वाचलेल्या साहित्याचे प्रकटीकरण आणि त्यावर चर्चा यांद्वारे, पालक आणि मुलांनाही बोलते केले गेले. एकंदरीत स्वामी विवेकानंदांच्या विचारसरणीप्रमाणे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना एकत्र आणून वाचन संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न बऱ्यापैकी यशस्वी होऊ लागला. आपल्या पालकांना वाचताना पाहून विद्यार्थी पण वाचू लागले आणि घरात दोघांनीही वाचलेल्या पुस्तकांबद्दल सुसंवादही होऊ लागला. यामुळे एकूण वाचन संस्कृतीत चांगला फरक पडून, ग्रंथालयातून पुस्तक वाचण्यासाठी घरी घेऊन जाणाऱ्या पालक/विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली. याबरोबरच वर्षातून सहा वेळा पालक

आणि पाल्य यांची सभा घेऊन त्यात काही पालकांना आपण वाचलेल्या पुस्तकावर विद्यार्थ्यांसमोर बोलण्याची संधी देण्यात आली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातून प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनाबरोबर पालकांनी त्यांच्याशी सुसंवाद करण्यावरही भर दिला गेला. सन २०१८ च्या कार्यक्रमात मी प्रमुख पाहुणा या नात्याने माझा खारीचा वाटा उचलला. एकंदरीत पाहता हा उपक्रम चांगलाच यशस्वी झाला यात शंका नाही. या उपक्रमावर मी 'शिक्षण संक्रमण' या मासिकामध्ये लेख लिहिला आणि त्याचा प्रसारही केला.

अलीकडच्या काळामध्ये विद्यार्थिदशेपासूनच वाचनाची आवड कमी झाली आहे असे खेदाने मान्य करावे लागते; परंतु त्यासाठी पालक, शिक्षक आणि त्यानंतर समाजातील आदर्श व्यक्तींनी पुढाकार घेऊन ती आवड रुजवली पाहिजे. आधी सांगितलेल्या 'पालक वाचन कट्टा' सारखे उपक्रम शाळा कॉलेजात राबवता येतील.

मला नाशिकच्या 'कुसुमाग्रज' प्रतिष्ठानचे या बाबतीतील कार्य अत्यंत कौतुकास्पद वाटते. त्यांनी पुस्तकपेटी ही संकल्पना नाशिक शहरापुरतीच मर्यादित न ठेवता, संपूर्ण महाराष्ट्रभर आणि इतरत्रही पसरवली आहे. आपण त्यांच्याशी संपर्क साधून ही पुस्तकपेटी मागवू शकतो आणि त्याचा उपयोग आपली शिक्षणसंस्था, सोसायटी अथवा आपला परिसर यासाठी करू शकतो. ही सर्व व्यवस्था निःशुल्क आहे.

अलीकडे इंटरनेटच्या माध्यमातून गुगलच्या अनेक संकेतस्थळांवर प्रचंड साहित्य विविध रूपात उपलब्ध आहे. याबरोबरच यू-ट्यूबसारख्या माध्यमातून ऑडिओ आणि व्हिडिओ क्लिप्स् उपलब्ध होत आहेत. 'स्टोरी टेल' ही संकल्पनासुद्धा बऱ्यापैकी रुजत आहे. वाचन, श्रवण आणि दर्शन यांतील कोणत्याही माध्यमाने आपण आपले ज्ञान समृद्ध करू शकतो. त्यासाठी लागणारा वेळ अनेक मार्गांनी उपलब्ध होऊ शकतो, हे माझ्या बस प्रवासातील उदाहरणाने सांगितलेच आहे. पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर हेसुद्धा आज ८० व्या वर्षी रोज २ तास सर्फिंग करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवतात!

वाचन संस्कृतीचे फायदे अमर्याद आहेत. त्यातील काही मी माझ्या अनुभवातून सांगितले. आता वाचन संस्कृती ही केवळ 'वैयक्तिक आवड' या सदरात मर्यादित न राहता, काळाची गरज झाली आहे. विविध उपक्रम राबवून वाचन संस्कृती दिवसेंदिवस वर्धिष्णू करण्यासाठी सर्वांना शुभेच्छा!

■■■

---

**(पृष्ठ क्र. १७ वरून)**

(१०) दैनंदिन अध्यापनातून शैक्षणिक तंत्रज्ञानविषयक आधुनिक साधनांचा वापर वाढविणे.

(११) सहभागी वाचन, मार्गदर्शित वाचन, प्रकटवाचन, स्वतंत्र वाचन या वाचनविषयक कृतींचा वापर करणे.

(१२) पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना वाचना-साठी विविध प्रकारचे स्तराधारित वाचन साहित्य उपलब्ध करून देणे व त्याचा वापर करणे.

(१३) Read along सारख्या विविध वाचनपूरक मोबाईल App चा वापर करणे.

(१४) वाचन कौशल्य विकासासाठी पालकांचा सहभाग (पालकांसोबत वाचन).

अशा प्रकारे शाळा व वर्ग स्तरावर, मराठी भाषा वाचन कौशल्य विकासासाठी उपक्रमांची अंमलबजावणी सातत्यपूर्ण पद्धतीने केल्यास, विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य निश्चितपणे विकसित होईल यात शंका नाही.

■■■

# वाचनगतीचे मापन

**डॉ. इब्राहिम नदाफ**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,सोलापूर.
भ्रमणध्वनी : ८६६८६८८१५०

लिखित मजकुराचे वाचन व अर्थनिर्वचन ही मानवाने प्रयत्नपूर्वक मिळवलेली कौशल्ये आहेत. वाचनामुळे आपला बहुमूल्य वेळ सत्कारणी लागतो. मनुष्याच्या ज्ञानात भर पडते, बुद्धीला चालना मिळते, एकाग्रतेत वाढ होते, विविध प्रश्नांची उकल होण्यासाठी मेंदूला मदत होते, आपल्या समस्येचे उत्तर मिळण्यासाठी विविध पर्याय सुचतात आणि यांतून समस्या निराकरणाचा आनंद मिळतो. इतरांशी सहजपणे संवाद साधताना प्रसन्नता लाभते. व्यक्तीच्या मनोरंजनासाठी वाचन हे चांगल्या प्रकारचे साधन आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्व विकास होतो व बहुश्रुतता वाढीस लागते. नियमित वाचन करणे हा मानवाचा स्थायीभाव बनणे आवश्यक आहे. शिक्षक, लेखक, कवी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञानी, राजकारणी, कलाकार यांना वाचनाच्या छंदातून त्यांच्या क्षेत्रात देदीप्यमान कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळते. वाचन प्रक्रियेत डोळे, तोंड, मेंदू इत्यादी अवयवांचा उपयोग करून घ्यावा लागतो. वाचन ही संमिश्र प्रक्रिया आहे. नॅशनल रीडिंग पॅनलच्या मते, ध्वनी उच्चारणातील जागरूकता, अक्षर चिन्ह आणि उच्चारण, वाचनाची गती, शब्दसंग्रह व आकलन हे वाचनाचे प्रमुख घटक आहेत. योग्य गतीने आकलनासह वाचन, ही व्यक्तिमत्त्व विकासातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. समजपूर्वक व गतीने वाचन यामुळे व्यक्तीला त्याच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारे यश मिळवता येते.

> *समजपूर्वक व योग्य गतीने वाचन करता येणे आवश्यक असते. वयोगटानुसार, इयत्तांनुसार वाचनगती अपेक्षित असते. वाचनगतीचे मापन व परीक्षण कसे करावे याबाबतीत मार्गदर्शन करणारा आणि वाचनाविषयीची शिक्षकांची जाण व समज वाढवणारा लेख.*

अस्खलितपणे वाचता येणे हे चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे निदर्शक आहे. यामध्ये अचूक उच्चारण व गती यांचा समावेश होतो. वाचन अस्खलित म्हणजे सहजपणे वाचनाची आणि प्रकटीकरणाची क्षमता होय. लिखित मजकुरातील अर्थबोध व्यवस्थितपणे होण्यासाठी अस्खलित वाचन असणे आवश्यक आहे. नियमितपणे वाचन केल्यास वाचनाचा वेग व अर्थबोध क्षमता यांमध्ये सुधारणा होते. बालकांना वाचनाचे आदर्श नमुने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आपली वाचनाची गती वाढवणे शक्य आहे. वाचनाची गती आणि आकलन क्षमता वाढवून शिक्षण आणि कार्यालयीन कामकाज यांमध्ये आनंद घेता येतो. प्रत्येक वाचकाला आपल्या वाचनाची गती आवश्यक प्रमाणात आहे किंवा नाही याचा बोध होणे आवश्यक आहे. यासाठी स्वतःला वाचनाच्या कसोट्यांचा उपयोग करता आला पाहिजे. सर्वसाधारण वाचनवेग व गती किती असली पाहिजे यांबाबत माहिती असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा वाचनवेग व गती पडताळण्यासाठी पालक, शिक्षक, निर्देशक, मार्गदर्शक किंवा स्वतः वाचक चाचणी आयोजित करू शकतात. या चाचणीच्या आयोजनासाठी विद्यार्थी ज्या इयत्तेत

अध्ययन करत आहे, त्या इयत्तेचा मजकूर वापरावा. वाचनवेग व गती चाचणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करावे :

(१) वयानुरूप योग्य परिच्छेदाची निवड करावी.

(२) स्टॉप वॉचच्या मदतीने वेळेचे व्यवस्थापन करावे.

(३) विद्यार्थ्यांना प्रकटवाचन करण्यास सांगावे.

(४) परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वाचनाचे निरीक्षण करावे व नोंदी ठेवाव्यात.

(५) शब्द प्रतिमिनिट या पद्धतीने वाचनाचा वेग काढावा.

**वाचन करताना पुढील चुका होऊ शकतात :**

(१) चुकीचे उच्चारण.

(२) वाचताना शब्द गाळणे.

(३) मजकुरात नसलेल्या शब्दांचे उच्चारण.

(४) शब्दांची पुनरावृत्ती.

(५) वाचन करताना स्वतः दुरुस्ती करणे.

वाचन करताना विद्यार्थ्यांनी पाच किंवा सहा चुका केल्यास, पडताळणीसाठी निवडण्यात आलेला परिच्छेद बदलून घ्यावा. नंतर निवडलेला परिच्छेद पूर्वीच्या परिच्छेदापेक्षा सोपा असावा. विद्यार्थ्यांचा वाचनवेग व गतीचे मूल्यांकन यांवरून त्यांचा वाचनाचा स्तर चांगला किंवा वाईट असे ठरवण्यात येऊ नये, तर या चाचणीचा उपयोग वाचनाची नैदानिक कसोटी म्हणून करण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार उपचारात्मक किंवा अतिरिक्त व पूरक कार्यक्रम देण्यात यावा. हा कार्यक्रम देताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होणार नाही, याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांची वाचन पडताळणी चाचणी ही वारंवार घेण्यात यावी व त्यांच्या वाचनातील सुधारणांचा अभ्यास करावा. अस्खलित वाचनाची सवय विकसित करावी. निरीक्षणे व नोंदी यांचा वापर विद्यार्थ्यांचा वाचनातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी व्हावा. वाचनादरम्यान विद्यार्थ्यांनी केलेल्या चुकांबाबत सक्तीने समज देऊ नये. या चुका टाळण्यासाठी त्याच्या आत्मसन्मानाला ठेच न लागता उपाययोजना करावी. वाचनगतीचे मूल्यांकन करण्याची अत्यंत सोपी पद्धती आहे. यामध्ये स्टॉपवॉचच्या मदतीने आपण प्रतिमिनिट वाचन क्षमता अजमावू शकतो. याचे पायाभूत सूत्र म्हणजे नियोजित वेळेत वाचलेले एकूण शब्द, भागिले वाचनासाठी लागलेला वेळ होय. शब्द प्रतिमिनिट हे वाचनाचे एकक आहे. शब्द प्रतिमिनिट तंतोतंत काढण्यासाठी प्रथमतः आपण वाचनासाठी लागलेल्या वेळेचे रूपांतर सेकंदामध्ये करावे. त्यासाठी वाचन करण्यास लागलेल्या एकूण मिनिटांना ६० ने गुणावे व त्यात उर्वरित सेकंद मिळवावेत.

**उदा. १** : एका वाचकाला ७५० शब्दांचा मजकूर वाचण्यासाठी ३ मिनिटे आणि २९ सेकंद लागले, तर त्याचा वाचन वेग किती?

**उत्तर :** प्रथमतः आपण वाचनासाठी लागलेल्या वेळेचे सेकंदात रूपांतर करू.

३ × ६० + २९ = २०९ सेकंद.

आता प्रतिमिनिट वाचनवेग काढू.

वाचन वेग = विशिष्ट वेळेत वाचलेले एकूण शब्द/वाचनासाठी लागलेला वेळ

= ७५०/२०९ = ३.५८ शब्द प्रतिसेकंद.

आता प्रतिमिनिट वेळ काढू

३.५८ × ६० = २१४.८ शब्द प्रतिमिनिट.

सदर वाचकाचा वाचनवेग २१४.८ शब्द प्रतिमिनिट आहे.

या पद्धतीवरून वाचकाला आपला वाचनाचा वेग काढता येतो. आपला वाचनवेग समजल्यानंतर सर्वसाधारण वाचनगती किती असावी याची माहिती

असणे आवश्यक आहे. या माहितीच्याद्वारे चांगला वाचक होण्यासाठी आपला वेग किती प्रमाणामध्ये वाढवला पाहिजे हे वाचकाला समजते व त्यासाठी उपाययोजना करता येते.

इंग्रजी वाचनाच्या दृष्टीने वाचनाचा वेग विविध संशोधनातून निश्चित करण्यात आलेला आहे.

**सर्वसाधारणपणे इयत्तानिहाय वाचनाचा वेग पुढील प्रमाणे असावा :**

- इयत्ता पहिली : ५३ ते १११ शब्द प्रतिमिनिट
- इयत्ता दुसरी : ८९ ते १५९ शब्द प्रतिमिनिट
- इयत्ता तिसरी : १०७ ते १६२ शब्द प्रतिमिनिट
- इयत्ता चौथी : १२३ ते १८० शब्द प्रतिमिनिट
- इयत्ता पाचवी : १३९ ते १९४ शब्द प्रतिमिनिट
- इयत्ता सहावी ते आठवी :
  १५० ते २०४ शब्द प्रतिमिनिट
- माध्यमिक स्तर :
  २०० ते ३०० शब्द प्रतिमिनिट
- महाविद्यालय स्तर :
  ३०० ते ३५० शब्द प्रतिमिनिट.

  (हॅासब्रॉक जे. आणि टिंडाल जी. २०१७)

साधारण वाचकाचा वाचनवेग हा २०० ते २५० शब्द प्रतिमिनिट असतो. चांगला वाचक असण्यासाठी वाचनवेग हा ३०० ते ४०० शब्द प्रतिमिनिट असणे आवश्यक आहे. उत्तम वाचकाचा वाचनवेग हा ९०० शब्द प्रतिमिनिट असतो, तर वाचनवेगाचा जागतिक विक्रम हा २००० शब्द प्रतिमिनिट असा नोंदवण्यात आलेला आहे.

**वाचनगती मापन :**

विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी केवळ वेगवान वाचन उपयोगाचे ठरत नाही, तर त्यासाठी गतिमान वाचन कौशल्य असणे आवश्यक आहे. गतिमान वाचनात वाचनाचा वेग व आकलन शक्ती या दोन गोष्टी अपेक्षित आहेत. वाचनगती मापनासाठी लिखित उतारा आवश्यक आहे. या उताऱ्यावर ठेवण्यासाठी एक पांढरा कागद, या उताऱ्यावर आधारित बहुपर्यायी प्रश्नसंच व स्टॉप वॉच इत्यादी साधनांची आवश्यकता असते.

स्टॉप वॉचमधील सेकंद काटा बरोबर बारावर आल्यावर वाचकांनी नेहमीच्या गतीने संपूर्ण उतारा वाचावा. उतारा वाचून झाल्याबरोबर लगेच मिनिटे व सेकंदांमध्ये अचूक वेळ कागदावर नोंदवावी. उताऱ्यावर आधारित चाचणीतील प्रश्न सोडवावेत. चाचणी सोडवताना पुन्हा उताऱ्याचे वाचन करू नये. चाचणी सोडवून झाल्यानंतर ती तपासून पाहावी. वाचनाचा वेग काढण्याच्या सूत्राने आपला वाचनवेग काढावा.

समजा, एका वाचन आकलन चाचणीमध्ये दहा बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण देण्यात आलेले आहेत. चाचणीतील निर्धारित गुणांचे शेकडा प्रमाण यावरून काढावे. एखाद्या वाचकाने एकूण दहा प्रश्नांपैकी चाचणीत पाच प्रश्नांची उत्तरे बरोबर नोंदवली असल्यास, त्याची आकलन क्षमता ५० टक्के आहे असे समजावे.

**उदा. २** : एका वाचकाला वाचण्यासाठी दिलेल्या उताऱ्यात एकूण १२०० शब्द आहेत. या उताऱ्याच्या वाचनासाठी वाचकाला ८ मिनिटे, १६ सेकंद वेळ लागला. या उताऱ्यावरील चाचणीतील प्रश्नांची संख्या १० आहे. वाचकाने चाचणीतील ५ प्रश्नांची उत्तरे बरोबर लिहिली असतील, तर त्या वाचकाचा वाचनवेग व वाचनगती काढा.

उताऱ्यातील शब्द = १२००

वाचनासाठी लागलेला वेळ = ८ मि. १६ सेकंद

८ मिनिटे १६ सेकंदाचे सेकंदात रूपांतर करूया.

८ × ६० + १६ = ४९६ सेकंद

**प्रथम आपण वाचनवेग काढू :**

वाचनवेग = उताऱ्यातील शब्दसंख्या ÷ उतारा वाचण्यासाठी लागलेला वेळ

= १२०० ÷ ४९६ = २.४१ शब्द प्रतिसेकंद

आता प्रतिमिनिट वेग काढू या.

२.४१ × ६० = १४४.६ शब्द प्रतिमिनिट

उताऱ्यातील १० प्रश्नांपैकी ५ प्रश्नांची उत्तरे बरोबर सोडवल्यामुळे आकलनशक्ती = ५ × १००/१०

= ५०%

वाचन गती = वाचन वेग × आकलनक्षमता

= १४४.६ × ५०/१००

= ७२.३ शब्द प्रतिमिनिट

सद्य:स्थितीत वाचनवेग व गती काढण्यासाठी मोफत व सशुल्क संगणकीकृत चाचण्या इयत्तानिहाय उपलब्ध आहेत. संगणकाद्वारे आपण आपला वाचनवेग व गती काढू शकतो. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी चांगल्या प्रकारचे संगणक सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. या सॉफ्टवेअरचा उपयोग करून वाचन क्षमता प्रयत्नपूर्वक वाढवता येते. उत्तम वाचक होण्यासाठी वाचनगतीमध्ये समाविष्ट असलेले दोन्ही घटक म्हणजे वाचनवेग आणि आकलन शक्ती आवश्यक प्रमाणात विकसित करावी लागेल, तरच वाचकाला वाचलेल्या मजकुराचे योग्य प्रकारे विश्लेषण व अर्थनिर्वचन करता येईल. स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी वाचनगती ही उत्तम असली पाहिजे. वाचनगती सुधारण्यासाठी स्वतः वाचकांनी किंवा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## जून २०२३ अंकातील शब्दकोड्याचे उत्तर

| | | |
|---|---|---|
| सु | ष | मा |
| प्रि | | नि |
| या | मि | नी |

| | | |
|---|---|---|
| सु | म | न |
| नं | | लि |
| दा | मि | नी |

| | | |
|---|---|---|
| मा | लि | नी |
| ल | | कि |
| न | मि | ता |

| | | |
|---|---|---|
| प्र | ति | भा |
| ति | | र |
| मा | ल | ती |


**वर्गणीदार होण्यासाठी**

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# वाचूया आनंदे

**डॉ. दत्तात्रेय तापकीर**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९९६०८४३१२७

*आपण वाचन करतो म्हणजे नेमके काय करतो, वाचनप्रक्रिया कशी घडते, निर्जीव अक्षरे अर्थबोधाने कशी सजीव होतात, याचे अत्यंत लालित्यपूर्ण व सर्वांना समजेल अशी मांडणी केलेला सुंदर लेख.*

नमस्कार मंडळी! माझा हा लेख आपण वाचावयास घेतला म्हणून आपले मनःपूर्वक अभिनंदन! त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे आपणास वाचता येते म्हणजे आपण भाग्यवान आहात. तुम्हांला वाचनाची क्रिया करता येते म्हणून तर कागद बोलका होत आहे; नाही तर पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने छापलेला मजकूर म्हणजे निरर्थक नक्षी ठरली असती. तुम्हांला वाचता येत नसलेल्या भाषेचे पुस्तक हातात घेऊन उघडून पाहा; म्हणजे कळेल; अर्थहीन कागद अथवा मुके पान म्हणजे काय ते!

भाषा ही मानवाला मिळालेली सर्वांत महत्त्वाची देणगी आहे. यात पुन्हा मौखिक भाषेपेक्षा लिखित स्वरूपातील भाषा ही तर आणखी श्रेष्ठ स्वरूपाची देणगी होय. प्राचीनकाळी ज्या पूर्वजांनी लिपीचा शोध लावला आणि अक्षरे लिहिण्याची कला शोधली ते पूर्वज खरोखरच धन्य व महान होते. त्यांचे आपल्यावर खूप उपकार आहेत. तेव्हापासून पिढ्यान्‌पिढ्या माणूस लिहीत आला आहे आणि लिहिलेले वाचत आला आहे.

मागे मी एकदा साक्षरतेचे पसायदान लिहिले होते. त्यामध्ये म्हटले होते ...

*'निरक्षरांची निरक्षरता जावो । विश्व साक्षरता सूर्ये पाहो।*
*जो जे वाचील, तो ते लिहो । साक्षर जात'*

मनात आलेले भाव किंवा विचार हातातून कागदावर उतरतात आणि लिपीने पुरविलेल्या अक्षरांच्या रूपाने कायमस्वरूपी कागदावर विसावतात, ठाण मांडून बसतात. वाचक जेव्हा हे लेखन हातात घेतो, तेव्हा तो त्या अक्षरांकडे पाहतो, ती ओळखतो, त्यांचा अर्थ जाणतो, म्हणजेच तो ते वाचतो. लेखकाच्या हाताद्वारे उमटलेली अक्षरे, जणू काही वाचकाच्या डोळ्यांद्वारे त्याच्या डोक्यात शिरतात, मनात शिरतात.

**लेखकाचे लेखन आणि वाचकाचे वाचन!**

हातून होते ते लेखन आणि डोळ्यांतून घडते ते वाचन! लिहिणाऱ्याच्या मनात म्हणा अथवा डोक्यात म्हणा, एखादा विचार असतो, भावना असते, कल्पना असते आणि मत असते. तो शब्दांच्या अर्थपूर्ण क्रमवारीनुसार मांडणी करून त्यांची वाक्ये करतो. बोटांनी लेखणी पकडून, कागदावर लाटांमागून लाटा याव्या तसे वाक्यांमागून वाक्यांचे परिच्छेद मांडतो. याला 'लेखन' म्हणतात.

वाचनात नेमके याच्या उलट घडते. वाचणारा म्हणजेच वाचक, त्या परिच्छेदाकडे एका ठरावीक दिशेने, ठरावीक क्रमाने, ठरावीक गतीने पाहात राहतो.

त्यावर डोळे सरकवत राहतो. डोळ्यांवाटे शब्द खातो, पितो, ग्रहण करतो, आत्मसात करतो. अक्षरे ओळखतो, शब्द जाणतो, वाक्य जोडतो, अर्थ लावतो, याला 'वाचन' म्हणतात.

लेखनाच्या माध्यमातून लेखकाला जे काही म्हणायचे होते, ते वाचनाच्या माध्यमातून वाचकाला सर्व काही उमजून येते. किती सुंदर प्रक्रिया! किती सुंदर चक्र!

या परस्पर सामंजस्यात लेखक आणि वाचक यांच्यात सामायिक लिपी हवी, सामायिक शब्दसंग्रह हवा, सामायिक व्याकरण हवे !

'वाचन' ही आपण समजतो तितकी सोपी गोष्ट नाही. मानवाच्या विकसित बुद्धीची ती कमाल आहे. वाचन ही कला आहे. वाचन हे शास्त्र आहे. वाचन ही गुंतागुंतीची सुंदर व मनोहारी प्रक्रिया आहे, ते अनेक प्रकारच्या क्रियांचे मिश्रण आहे, वाचन ही शारीरिक क्रिया आहे. वाचन ही मानसिक क्रिया पण आहे. शरीराने वाचायचे असते. मनाने वाचायचे असते, बुद्धीने वाचायचे असते. भावनेने वाचायचे असते, डोळ्यांनी वाचायचे असते. ओठांनी वाचायचे असते. गुपचूप वाचायचे असते. मोठ्याने वाचायचे असते.

एकट्याने वाचायचे असते. दुकट्याने वाचायचे असते. सर्वांनी वाचायचे असते. डोळे उघडे ठेवून वाचायचे असते, डोळे मिटून वाचायचे असते. शब्द वाचायचे असतात, शब्दांच्या पलीकडले वाचायचे असते. ओळी वाचायच्या असतात. ओळींच्या मधले वाचायचे असते, विराममिन्हे वाचायची असतात, पूर्णविरामाला थांबायचे असते, स्वल्पविरामाला थोडेसे थांबायचे असते, प्रश्नचिन्ह कपाळाला आठ्या पाडून वाचायचे असते, उद्गारवाचक चिन्ह डोळे मोठे करून वाचायचे असते, कंसातील मजकूर डोळे बारीक करून वाचायचा असतो, तर आवडलेले वाक्य दोनदा वाचायचे असते. हळुवार विनोद गाल्यातल्या गालात हसून वाचायचा असतो. भन्नाट विनोद खळखळून हसून वाचायचा असतो, उत्कंठावर्धक वर्णन अधाशासारखे घाईत वाचायचे असते, तर चिंतनशील मजकूर सावकाश वाचायचा असतो. अन्यायाचे वर्णन मुठी आवळून, दात ओठ खात वाचायचे असते. दुःखाचे पदर उलगडणारे वर्णन डोळ्यांत आसवे आणून वाचायचे असते.

वाचन ही खूप छान प्रक्रिया असते. वाचन म्हणजे पुस्तकाशी नाळ जोडणे असते, पुस्तकाशी मैत्री करणे असते, लेखकाला जाणून घेणे असते, लेखकाच्या अंतरंगात शिरणे असते आणि आपल्यादेखील मनात डोकावणे असते. वाचन म्हणजे हातात धरलेले पुस्तक, बोटांनी उलटणारी पाने, चेहऱ्यावर बदलणारे हावभाव, मेंदूमध्ये होणारे ग्रहण व आकलन, खोल स्मृतीमध्ये उठणाऱ्या लाटा आणि आत्म्याला मिळणारे समाधान या सर्वांचा एकत्रित सोहळा असतो. मैफल असते. ऑर्केस्ट्रॉ असतो. वाचन अजून काय असते माहीत आहे! वाचन साधना असते, तपश्चर्या असते. वाचन छंद असतो, विरंगुळा असतो. वाचन उद्बोधन असते, ध्यास असतो, मनोरंजन असते. वाचन आस असते, वाचन वेड असते. वाचन तल्लीनता असते, वाचन समाधी असते. वाचन विद्यार्थ्यांची शिदोरी असते. शिक्षकांची पुंजी असते. वाचन सरस्वतीचा वसा असतो, व्रत असते. वाचन ज्ञानपिपासूंसाठी तहान असते, भूक असते. वाचन शब्दांच्या उद्यानात विहार असतो, जणू कल्पनेच्या नभात भरारी असते.

वाचन हा डोळ्यांचा प्रवास असतो. पायी प्रवास करताना जसे आपले पाय कधी हळू चालतात, तर कधी जलद. कधी थोडे थांबतात, थबकतात, तर कधी किंचित माघारी येतात. वाचनाच्या प्रवासात डोळेदेखील हेच करतात; कधी चालतात तर कधी पळतात, कधी थबकतात, तर कधी थोडे मागे येऊन आवडलेले वाक्य पुन्हा न्याहाळतात. मजकुरातील विरामचिन्हे म्हणजे जणू काही वाचन रस्त्यावरील वाहतुकीच्या खुणाच! पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह, हे सगळे वाचणाऱ्या डोळ्यांचा प्रवास नियंत्रित करतात. वाक्यांमधील उभयान्वयी अव्ययेदेखील आपल्या

डोळ्यांची पावले दिग्दर्शित करतात आणि तसेच असे शब्द आले, की आपले डोळे नव्या दमाने पुढे सरसावतात. तेच पण, परंतु असे शब्द आले, की डोळे मुकाट्याने यू-टर्न घेऊन वळतात आणि काहीतरी विरुद्ध अर्थासाठी तयार राहतात. विवेचनात काही दुर्बोध चिंतनपर मजकूर आला, की जणू काही डोळ्यांच्या आणि मनाच्या प्रवासासाठी 'घाट सुरू – सावधान' अशी अलिखित सूचना आल्यासारखी वाटते आणि ते अवघड विवेचन संपले, की जणू काही 'घाट संपला धन्यवाद', असे समजून सुस्कारा टाकता येतो.

वाचनातून मिळणाऱ्या अगणित फायद्यांची यादी करणे खूप मोठे काम होईल. ज्ञानप्राप्ती, आनंदप्राप्ती, मार्गदर्शन, भाषिक विकास, शब्दसंग्रहात वाढ, अनुभवांची देवाणघेवाण, संशोधन, मनोरंजन, नवीन माहिती, मूल्यांची रुजवणूक, फुरसतीचा सदुपयोग अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. मनोरंजनासाठीचे वाचन वर वर केले जाते, तर ज्ञानप्राप्तीसाठीचे वाचन खोलवर व सविस्तर करावे लागते. जीवनाचा अर्थ सांगणारी, तत्त्वज्ञान स्पष्ट करणारी व नैतिक आचरणाचा उपदेश करणारी पुस्तके वाचताना, अन्न सावकाश चावून खाल्ल्याप्रमाणे संथपणे, काळजीपूर्वक आशयाचा अर्थ ग्रहण करावा लागतो. पुस्तके पचविणे म्हणजे त्याचा संदेश हृदयात ठेवून आचरणात आणायचा असतो, म्हणून फ्रान्सिस बेकन नावाच्या इंग्रज विचारवंताने म्हटले आहे, की "Some books are to be tasted, others are to be swallowed and some few to be chewed and digested."

शिक्षकांनी मोठ्याने वाचणे किंवा प्रकटवाचन हे कौशल्यदेखील आत्मसात करायला हवे, भाषेच्या शिक्षकांसाठी अर्थपूर्ण प्रभावी वाचन हे उत्तम अध्यापनाचे महत्त्वाचे अंग आहे हे ध्यानात ठेवायला हवे. बी. एड. महाविद्यालयात शिकवत असताना, मी माझ्या विद्यार्थिनींना प्रकटवाचनाचे मर्म समजावीत असताना, स्वतः रचलेल्या ओव्या म्हणून दाखवायचो. त्या ओव्या येथे योग्य ठरतील असे वाटते.

*वाचन कैसे असावे। जैसे सरितेचे प्रवाहे ।*
*एक दिशे एक गती वाहत राही ।।*
*वाचन कैसे असावे? जैसे सागरे गर्जावे।*
*लयबद्ध नर्तन लाटांचे । किनाऱ्यावरी ।।*
*वाचन कैसे असावे । जैसे वायूचे विहरणे ।*
*श्वासाचिया ठाव घेऊनी । शब्द प्रगटती ।।*
*वाचन कैसे असावे, जैसे तरूलतांचे डोलणे।*
*शब्दांमागूनी शब्द उलगडती ।।*
*वाचन कैसे असावे । जैसे बिजलीचे झळकणे।*
*दाविता भावनाकल्लोळ । झडकरी ।।*

मित्रहो, वाचन महिमा अक्षरशः अगाध आहे. वाचन साक्षरतेचे भूषण आहे. शब्दांचे तोरण आहे. वाचाल तर वाचाल ही उक्ती अगदी सार्थ आहे.

समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे' हे लक्षात घ्यायला हवे. आपल्यासाठी वाचन हा आजीवन व आमरण आनंद असायला हवा. भरतनाट्यशास्त्रात भरतमुनींनी म्हटले आहे, की नाटक पाहणे हा डोळ्यांनी करावयाचा 'नेत्रयज्ञ' आहे. शेवटी माझ्याच एका कवितेतील काही ओळींनी लेखाचा समारोप करतो,

*पुस्तकांबरोबर मैत्री असावी, जशी असावी गट्टी।*
*पुस्तकांशी सदा बट्टी असावी, नकोच केव्हा कट्टी।।*
*पुस्तकांशी जुळवून घ्यावे, गहिवरलेले नाते।*
*सुरू करावे ज्ञानधनाचे, कायमस्वरूपी खाते।।*
*पुस्तकांना सांगून टाकावे, मनात जे जे सलते।*
*मुक्त मोकळे येऊ दयावे, आनंदाचे भरते।।*

# सोप्याकडून कठिणाकडे - वाचन कौशल्य उपक्रम

**रावसाहेब शितोळे**
जि. प. प्राथ. शाळा, उंबरे,
ता. भोर, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : ९२८४५०३२९१

*विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेमध्ये वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वाचनाची गोडी लावण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न केले जातात. विविध उपक्रम राबवले जातात. जि. प. शाळा उंबरे येथील शिक्षकांनी सोप्याकडून अवघडाकडे या अध्यापन तंत्राचा वापर करून राबवलेल्या उपक्रमाविषयीचा लेख.*

लहानपणापासून वाचनाची सवय लागावी, वाचलेल्या शब्दांचा, वाक्यांचा, परिच्छेदाचा अर्थ समजावा या हेतूने इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित व्हावे, या हेतूने मी जि. प. प्राथ. शाळा कासुर्डी खे. बा. ता. भोर या शाळेवर कार्यरत असताना विद्यार्थ्यांसाठी वाचन अचूक, गतीने व समजपूर्वक करता यावे यासाठी वाचन उपक्रम राबविला होता.

पहिलीपासूनच मुलांचा वाचन-लेखनाचा पाया भक्कम व्हावा, या दृष्टीने काही अक्षरांचे गट, शब्दांचे गट आणि वाक्यांचे गट करून अक्षरकार्डे, शब्दकार्डे आणि वाक्यपट्ट्या यांचा वापर करून विद्यार्थ्यांचेही वेगवेगळे गट तयार करून घेतले. विद्यार्थ्यांना सहज वाचता येईल, पहिल्यावेळी वाचताना कठीण वाटणार नाही याचा प्रामुख्याने विचार करून अशा प्रकारचे साहित्य वाचन कौशल्यासाठी तयार करण्यात आले.

सोप्याकडून अवघडाकडे या अध्यापन सूत्राचा वापर करून वाचन उपक्रम राबविण्याचे निश्चित झाले. यासाठी वेगवेगळी अक्षरे, शब्द, वाक्ये असे विभागांनुसार वाचनाचे ट्रे तयार करण्यात आले. पहिली ते चौथीपर्यंतचे वाचनात गती कमी असणारे, अडखळत वाचणारे, अजिबात अक्षर ओळख नसणारे; अशा त्या त्या स्तरानुसार विद्यार्थ्यांच्या नावासहित नोंदी करण्यात आल्या. याची माहिती फक्त शिक्षकांपुरती राहील याची काळजी घेण्यात आली, कारण विद्यार्थ्यांना आपण वाचनात कमी आहोत, आपले नाव कोणत्या गटात आहे याची कल्पना येऊ दिली नाही. त्यांच्यामध्ये सर्वप्रथम आत्मविश्वास निर्माण केला.

निरागस व कोवळ्या बालमनात आपण अभ्यासात मागे आहोत ही भावना न येता, मला सर्वांसारखे छान वाचता येणार असा आत्मविश्वास निर्माण करून दिला. इयत्तानिहाय वाचनासाठी पूरक साहित्याची जमवाजमव केली. अशा वाचन-साहित्याची वर्गवारी (वर्गीकरण) करून नियोजन करण्यात आले. यासाठी पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आला.

**उपक्रमासाठी आवश्यक साहित्य जमविणे :**

(१) स्वरचिन्हविरहित अक्षरपट्ट्या

(२) स्वरचिन्हविरहित शब्दपट्ट्या

(३) स्वरचिन्हविरहित वाक्यपट्ट्या

(४) स्वरचिन्हविरहित छोटे छोटे परिच्छेद लिहिलेली कार्डे

(५) स्वरचिन्हांसहित अक्षर, शब्द, वाक्ये, परिच्छेद लिहिलेली कार्डे.

(६) छोटी छोटी गोष्टींची पुस्तके

(७) पाठ्यपुस्तकातील काही वाक्ये, परिच्छेद निवडलेली कार्डे

(८) चित्रकार्डे आणि शब्दकार्डे

(९) चित्ररूप गोष्टींची पुस्तके

(१०) दुकानांच्या नावांच्या पाट्या लिहिलेली कार्डे

वर नमूद केलेले वाचनसाहित्य सहज उपलब्ध होणारे आहे. यातील अक्षर, शब्द, वाक्ये, परिच्छेद आपण कार्डशीटवर लिहून तयार करू शकतो. गोष्टींची पुस्तके आपल्याला शालेय वाचनालयात उपलब्ध होऊ शकतात. वरीलप्रमाणे साहित्य उपलब्ध करून घेऊन उपक्रम राबवल्यास, तो नियोजनबद्ध होऊन आपला वेळ वाचू शकतो.

**वाचन कौशल्य उपक्रम :**

**(१) चला अक्षरे वाचूया :** इयत्ता पहिलीत विद्यार्थ्यांना अक्षर ओळख करून दिल्यानंतर वाचन सराव व्हावा यासाठी अक्षरे वाचून घेणे, अक्षरांचा क्रम जुळवून शब्द तयार करणे, अक्षरांपासून नवनवीन शब्द तयार करणे असे उपक्रम घेता येतील.

**(२) शब्दांची आगगाडी :** आगगाडीचा डबा आणि त्यामागे शब्दांचे डबे जोडून विद्यार्थ्यांना आवडीने, आनंदाने, वाचता येईल असे वेगवेगळे शब्दांचे डबे तयार करता येतील. यामध्ये फक्त सुरुवातीला रेल्वे इंजिनचा डबा व मागे शब्दकार्ड जोडून ठेवता येतील. छोटेछोटे शब्द जोडून वाक्ये तयार करता येतील.

उदा., : अमर घर बघ.
सोहम लाडू खातो.

**(३) वाक्यांचे डोंगर :** यामध्ये छोटे दोन शब्दांचे वाक्य, तीन शब्दांचे वाक्य अशी पाच–सहा वाक्ये तयार करून वाचन करताना गंमत वाटेल. वाचनात आनंद निर्माण होईल.

उदा. : आंबा आहे.
आंबा गोड आहे.
आंब्याचा रंग केशरी, पिवळा.
आंबा आहे कोकणचा राजा महान.

याप्रमाणे वाक्यांचे डोंगर किंवा शब्दांचे डोंगर बनवून विद्यार्थ्यांना कृतीमध्ये सहभागी करून घेऊन वाचन करून घेता येईल. त्यामुळे केवळ पाठ्यपुस्तकांचे वाचन न होता विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाचा सराव होईल.

**(४) परिच्छेद वाचतो मी एकदम छान :** वाचनाच्या स्तरानुसार वाक्यांचे सोपे सोपे परिच्छेद तयार करता येतील. वाक्यांचे गतीने वाचन करता आल्यानंतर, छोटे छोटे परिच्छेद वाचताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास येईल. वाचन आनंददायी होईल.

एखादा विषय निवडून त्यावर आधारित चार–पाच वाक्ये, दहा वाक्ये असा परिच्छेद तयार करता येईल. शाळेमध्ये अशी वाचन कार्डे भरपूर उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करून आपल्याला वाचन सराव करता येईल. चार–पाच वाक्यांचे सोपे परिच्छेद कार्डशीटवर लिहून तयार करता येतील.

**(५) चला वाचूया गोष्टी छान :** शालेय वाचनालयातील पुस्तके सहज उपलब्ध होतील. यातील सोपी, काठिण्यपातळी कमी असणारी अशी पुस्तके निवडून वाचनकट्टा तयार करता येईल. उत्कृष्ट वाचणाऱ्या एका विद्यार्थ्याची निवड करून, त्याला नेतृत्व देऊन विद्यार्थ्यांना गोष्टींची पुस्तके वाचायला देण्याची जबाबदारी देता येईल आणि मुलांना गोष्टींची पुस्तके उपलब्ध करून देता येतील.

**(६) चला गोष्टी सांगू या :** परिपाठात मुलांना वाचलेल्या कथा सांगण्यासाठी मार्गदर्शन करता येईल. वाचलेली गोष्ट, प्रत्येक दिवशी वारानुसार वर्गातील प्रत्येक विद्यार्थी सांगेल. यामुळे

**(पृष्ठ क्र. ३९ वर)**

# गोष्टी वाचनातून मुलांचा भाषाविकास

**शुभांगी भोसले**
जि. प. प्राथ. शाळा, निगडे बु.,
ता. वेल्हे, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : ९३७३३१९८९३

पर्यावरणाच्या समतोलासाठी व रक्षणासाठी वृक्षसंवर्धनाची जशी गरज आहे, तशीच मानव विकासासाठी जाणीवपूर्वक भाषा संगोपन करण्याची आवश्यकता आहे.

मानवी जीवनात भाषेला अतिशय महत्त्व आहे. मातृभाषेचा विकास झाल्याशिवाय इतर कोणत्याही शिक्षणाचा विचार करता येत नाही. मातृभाषा विचार व्यक्त करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. आपण आपले व्यवहार हे मातृभाषेतून करत असतो. भाषेचा विकास झाल्याशिवाय दैनंदिन व्यवहाराचे व इतर विषयांचे शिक्षण घेणे शक्यच होत नाही.

छोट्या पुस्तकात मोठ्या जीवनाचे सामर्थ्य दडलेले असते. पुस्तक वाचनातून मुलांच्या मनात नेमके काय रुजले हे सांगणे अथवा समजणे फार अवघड असले, तरी चांगल्या पुस्तकातून चांगले विचार व अनुभव मिळतात. म्हणून प्रत्येकाने वाचन संस्कृती जोपासली पाहिजे.

*हे नच पुस्तक, ही तर खिडकी,*
*जग भवतीचे बघण्यासाठी.*
*हे नच पुस्तक, ही तर दुर्बीण,*
*अदृश्याला भिडण्यासाठी.*

जेवढी अधिक पुस्तके वाचू तेवढी अधिक माहिती, अनुभव, ज्ञान यांची शिदोरी विद्यार्थ्यांना मिळते. बालमनात तरल भावना व जाणिवा निर्माण होण्यासाठी गोष्टी वाचनाचे माध्यम उपयुक्त ठरते. समाजातील बदलत्या जीवनपद्धतीमुळे किंवा वेळेअभावी, गोष्टीरूप असलेला संवाद लोप पावला आहे. मुलांना गोष्टी सांगणारे आजी-आजोबा दुर्मीळ होत आहेत. मुलांच्या निरागस मनावर संस्कार करण्याचे व त्यांना आशावादी बनवण्याचे काम गोष्टी करत असतात. कथेचे गारूड मुलांच्या मनात कल्पनेचे व सर्जनाचे पाखरू निर्माण करते. "Imagination is better than knowledge." गोष्टी वाचल्याने मनोरंजनातून एकाग्रता आणि आकलनाचे कार्य घडत असते. मुलांच्या जाणिवा आणि संवेदनांचे कंगोरे विकसित होण्याची प्रक्रिया विविध प्रकारच्या गोष्टी वाचण्यातून होत असते.

> *मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी त्यांना त्यांच्या वयोगटानुसार उपयुक्त व आवश्यक ते वाचायला दिले पाहिजे. त्यांच्यावर वाचन संस्कार करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवता येऊ शकतात. जि. प. शाळा निगडे बु. या शाळेतील शिक्षकांनी आपल्या वर्गात राबवलेल्या वाचन उपक्रमासंबंधीचा हा लेख सर्वच शिक्षकांना उपयुक्त ठरेल.*

**उपक्रमासाठी आवश्यक साहित्य जमवणे :**

(१) चित्रवर्णनासाठी मुलांच्या भावविश्वातील चित्रसंग्रह गोळा करणे.

(२) मुलांच्या वयोगटानुसार आकर्षक व उपयुक्त उतारे तयार करणे व त्यांचा संग्रह करणे.

(३) चित्ररूप गोष्टींचा संग्रह तयार करणे.

(४) वाचनक्षमतेनुसार इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध गोष्टींच्या पुस्तकांची निवड करणे.

**उपक्रम :**

**(१) चित्रवर्णन :** चित्रवर्णनातून मुलांच्या मनातील भावविश्व उलगडते. वास्तव चित्राचे वर्णन करता करता मुलांच्या मनातील कल्पनांची फुलपाखरे समजण्यास मदत होते. वास्तवापलीकडे जाऊन त्यांचे चौकटविरहित जग पाहिल्यावर नवल वाटते. त्यांच्या मनातील कल्पनांनी त्यांच्यासोबत आपणही समृद्ध होतो.

**(२) स्वरचिन्हांनुसार गोष्टींची पुस्तके :** लहान मुलांना स्वरचिन्हांनुसार गोष्टींची पुस्तके दिल्याने ठरावीक स्वरचिन्हांचे दृढीकरण होते. त्यामुळे गोष्टी वाचताना मुलांचा आत्मविश्वास वाढतो. या गोष्टींच्या प्रकारांमुळे इयत्ता पहिलीतील मुलेही सहजरीत्या पुस्तक वाचून पूर्ण करतात.

**(३) सहभागी वाचन :** लहान वयोगटातील मुलांचे सहभागी वाचन घेता घेता, वाचलेल्या भागावर प्रश्न विचारल्यामुळे मुलांचे अवधान टिकून राहण्यास मदत होते. शिवाय वाचलेल्या भागाचे दृढीकरण होते. सहभागी वाचनामुळे वाचनाचा वेग, शब्दांवरील आघात, आवाजातील आरोह-अवरोह याचा प्रत्यक्ष अनुभव मिळून, त्या अनुभवानुसार सराव करण्याची संधी मुलांना मिळते. वाचन विकासासाठी सहभागी वाचन उपयुक्त ठरते.

**(४) गोष्टींचे अभिवाचन :** गोष्टींचे अभिवाचन करणे म्हणजे प्रत्यक्ष ध्वनी माध्यमातून ती गोष्ट प्रत्यक्ष घडत आहे, हा अनुभव आवाजाच्या माध्यमातून घेता येतो. आनंद, दुःख, भीती, राग या भावना अभिवाचनामुळे मुलांच्या मनात निर्माण होतात. मुलांची मने संवेदनक्षम करण्याची क्षमता अभिवाचन या उपक्रमातून साध्य होते. अभिवाचनासाठी मुलांना वाचन सरावाबरोबरच आवाजाची तीव्रता, आवाजातील चढउतार, तसेच गोष्टीचा आशय समजून घ्यावा लागतो. त्यामुळे मुलांचे वाचन हे आकलनासह व भावपूर्ण होते.

**(५) गोष्टी वाचन तासिका :** 'समग्र अभियान' अंतर्गत जिल्हा परिषद शाळेत अनेक पुस्तके मुलांना वाचनासाठी उपलब्ध आहेत. जिल्हा परिषदेच्या फंडातून वाचनालयास पुस्तके उपलब्ध झाली आहेत. मुलांना ही सर्व पुस्तके पाहण्याची संधी मिळतेच, शिवाय आपल्या आवडीची पुस्तके मुलांना गोष्टी वाचन तासिकेमध्ये वाचायला मिळतात. या तासिकेमुळे विद्यार्थ्यांना वाचनासाठी आवश्यक वातावरण मिळते. या तासिकेत मुलांच्या विविध गोष्टी वाचून होतात. गोष्टी वाचनात रुची निर्माण होऊन मुलांची भाषा समृद्ध होते व त्यांच्या आकलन कक्षा रुंदावतात.

**(६) सुट्टीतील वाचनालय :** उन्हाळ्यात शाळेला सुट्टी असते. त्यामुळे मुलांना मोकळा वेळ भरपूर असतो. आवडते पुस्तक घेऊन सुट्टीच्या दिवसात निवांत वाचता यावे यासाठी फिरते वाचनालय सुरू केले आहे. वाचनालयाची पुस्तकांची पिशवी सांभाळण्याची जबाबदारी इयत्ता सातवीच्या एका विद्यार्थ्याकडे सोपवली. शाळेला सुट्टी असल्यामुळे ताणतणावविरहित वाचन करता येते. त्यामुळे वाचनाचा हेतू साध्य होऊन मुलांना वाचनाचा आनंद मिळतो.

**(७) पुस्तक प्रदर्शन :** मुलांना विविध गोष्टींची पुस्तके पाहता यावीत, म्हणून पुस्तक प्रदर्शन भरवण्यात येते. पुस्तके पाहताना मुलांच्या मनात त्या पुस्तकांबद्दल कुतूहल, जिज्ञासा निर्माण होऊन या पुस्तकांत काय सांगितले आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण होते.

**(८) कथाकथन स्पर्धा :** अनेक गोष्टी वाचल्यानंतर आकलनात्मक पातळीवर किती वाचन झाले हे जाणून घेण्यासाठी कथाकथन स्पर्धेचे आयोजन केले. उत्तम गोष्ट सांगण्याचे निकष निश्चित के ले.

उदा. :

(१) गोष्ट सांगण्याचा वेग.

(२) आवाजातील आरोह–अवरोह यांचा योग्य वापर.

(३) सहजता.

(४) आवाजातील स्पष्टता.

वरील निकषांवर आधारित स्पर्धा घेतली. या स्पर्धेमुळे मुलांमध्ये गोष्टी वाचनातून काय बदल झाला हे जाणून घेण्याचा प्रयत्न कथाकथन स्पर्धेमार्फत साध्य झाला.

**(९) वाचनालयास भेट :** शाळेतील वाचनालयाला भेट, तसेच गोष्टींच्या पुस्तकांची देवाण–घेवाण यांचे प्रात्यक्षिक दिले. या उपक्रमामुळे मुलांच्या मनात पुस्तकांत डोकावण्याची इच्छा निर्माण होऊन एका पुस्तकानंतर कोणते पुस्तक वाचायचे हे मुले ठरवतात.

### नवोपक्रमाची यशस्विता :

(१) गोष्टी वाचनामुळे मुलांना आनंद मिळाला, तसेच मुलांचे मनोरंजन झाले.

(२) विविध गोष्टी वाचनामुळे विविध माहिती मिळून मुलांचे व्यवहारज्ञान वाढण्यास मदत झाली.

(३) मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळाली.

(४) मुलांमध्ये सकारात्मक वृत्ती निर्माण होऊन भावना व्यक्त करणे सुलभ झाले.

(५) मुलांची भाषा विकसित होण्यास मदत झाली, तसेच विद्यार्थ्यांना अध्ययनात रुची निर्माण झाली.

(६) भावनिक, बौद्धिक, सामाजिक पातळीवर विकास होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली.

(७) विद्यार्थ्यांना आपले विचार अभिव्यक्त करण्यास मदत झाली.

■■■

**(पृष्ठ क्र. ३६ वरून)**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. वाचलेली गोष्ट सांगताना विद्यार्थ्यांच्या वाचनाचे दृढीकरण होईल.

इयत्ता पहिली ते सातवी इयत्तेनुसार, वर्गानुसार मुलांचे वाचन कौशल्य विकसित करता येईल. अगदी वरच्या इयत्तेतील एखादा विद्यार्थी वाचन कौशल्यात मागे पडला, तरी तो विद्यार्थी वाचनाच्या कोणत्या स्तरावर आहे हे पाहून त्या त्या स्तरावरील वाचनसाहित्य उपलब्ध करून देता येईल. आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी आपापल्या वर्गासाठी हा वाचन कौशल्य उपक्रम मनापासून राबवल्याने हा उपक्रम यशस्वी झाला. केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, यांनी शाळेला भेटी देऊन शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### उपक्रमाची यशस्विता (परिणामकारकता) :

(१) अक्षर वाचन सरावाने इयत्ता पहिलीत पाया पक्का झाला. (२) वाचनासाठी आत्मविश्वास निर्माण झाला. (३) सोप्याकडून अवघडाकडे, यामुळे वाचनाबद्दल असणारे दडपण दूर झाले. (४) वाचनाबद्दल मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. (५) विद्यार्थी स्वतः पुस्तके घेऊन वाचन करू लागले. (६) विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण झाली. (७) वाचन–लेखन प्रक्रिया प्रभावीपणे विकसित झाली. (८) कथाकथनामुळे सभाधीटपणा, आत्मविश्वास निर्माण झाला. (९) विद्यार्थ्यांच्या भावनिक, बौद्धिक, सामाजिक विकासासाठी वाव मिळाला. (१०) मुलांना अवांतर वाचन करण्याची सवय लागली. (११) वाचनाची गती वाढली. (१२) विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीमध्ये भर पडली. (१३) प्रत्येक इयत्तेत वाचनगती कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांची वाचनाची गती वाढली.

■■■

# फिरते बालवाचनालय

**लक्ष्मीकांत ईडलवार**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नायगाव,
ता. जामखेड, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९९७५०३५०४६

*बऱ्याच ठिकाणी वाचनालय, ग्रंथालय यांसाठी शाळेत पुरेशी जागा नसते त्यावरचा उपाय म्हणून नायगाव येथील शाळेने फिरते बालवाचनालय सुरू केले. शाळेच्या मैदानात, झाडाखाली किंवा उपलब्ध जागेत बालवाचनालयाची मांडणी करून मुलांना वाचनाचा आनंद घेता येतो याविषयीचा हा लेख.*

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पूर्वप्राथमिक ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्यास सन २०२६ -२७ पर्यंत मूलभूत स्तरावर वाचन-लेखन व अंकगणिताच्या क्षमता प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.

पायाभूत साक्षरता प्राप्तीसाठी वाचन सवय ही एक महत्त्वाची बाब आहे, मुलांमध्ये वाचनाची सवय विकसित होणे गरजेचे आहे. यासाठीच वाचन विकास उपक्रम हाती घेण्यात आला.

कोरोना परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा होणारा अध्ययन ऱ्हास जाणून घेण्यासाठी पायाभूत साक्षरता व मूलभूत संख्याज्ञानविषयक अध्ययनस्तर निश्चित करून विद्यार्थी स्तरनिश्चितीनुसार उपचारात्मक अध्यापन करून, वाचन स्तर उंचवण्यासाठी विविध प्रयत्न शासनाकडून करण्यात आले; परंतु स्थानिक परिस्थिती, गैरहजेरीचे प्रमाण, पालकांची अनास्था इत्यादी कारणांमुळे विद्यार्थ्यांना अपेक्षित क्षमता प्राप्त झाली नाही, हे दिसून आले. विद्यार्थ्यांचे आकलनात्मक वाचन, ओघवते वाचन, शब्दसंग्रह वृद्धिंगत करणे व वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी वाचन विकास हा उपक्रम हाती घेण्यात आला.

**उद्दिष्टे :**

- अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे.
- एकाग्रता व शब्दसंपत्तीत वाढ करणे.
- अस्खलित व समजपूर्वक वाचन करणे.
- भयमुक्त वातावरणात व निसर्गाच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सक्षम करून स्वयं-अध्ययनाची सवय लावणे.

वाचनाने ज्ञान व शब्दसंपत्ती वृद्धिंगत होते, म्हणून प्रत्येक शाळेत ग्रंथालय असावे अशी शिक्षक, विद्यार्थी व पालकांची इच्छा असते; पण जिल्हा परिषदेच्या शाळेत ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. काही शाळांनी ग्रंथालयासाठी स्वतंत्र कपाट वर्गात/कार्यालयात ठेवून तात्पुरती सोय केलेली आहे.



**उपाययोजना :**

आमच्या शाळेतही ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने त्यावर उपाय म्हणून आम्ही फिरते बालवाचनालय सुरू केले. एका वर्गात ग्रंथालयासाठी आवश्यक पुस्तके ठेवण्यासाठी कपाट ठेवले व बैठक व्यवस्थेसाठी लहान मुलांच्या बेबी चेअर लोकसहभागातून उपलब्ध करून घेतल्या.




शाळेच्या मैदानावर खुर्च्या वर्तुळाकार ठेवून मध्यभागी मोठी छत्री ठेवली. ज्या वर्गातील विद्यार्थ्यांना वाचनालयातील पुस्तकांचे वाचन करायचे असेल, ते विद्यार्थी मैदानात ठेवलेल्या खुर्च्यांवर बसून वाचन करतात. वाचनासाठी गोष्टींची पुस्तके, किशोर मासिक यांचा वापर केला जातो. आकर्षक व हवेशीर बैठक व्यवस्था असल्याने वाचनासाठी विद्यार्थी आनंदाने, स्वयंप्रेरणेने बसतात. खुर्च्या व छत्रीची रचना विद्यार्थी आपल्या आवडीने हवी तेथे व हवी तशी करून घेतात, त्यामुळे हे फिरते बालवाचनालय विद्यार्थ्यांच्या आवडीचे ठरत आहे.

त्याचबरोबर द्वि-शिक्षकी व तीन-शिक्षकी शाळेत एका शिक्षकाकडे एकापेक्षा अधिक वर्ग असल्याने, एका वर्गाचे अध्यापन चालू असताना दुसऱ्या वर्गातील विद्यार्थी खुर्चीवर बसून वाचन/अभ्यास करतात. या वाचनालयाचा असा दुहेरी फायदा होत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन, विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीतही भर पडत आहे.

ज्या ठिकाणी कसलीच सोय नाही, अशा शाळेत वाचनदोरी सारखा प्रयोग करता येईल. काही कल्पक शिक्षक पुस्तकाचे झाड, पुस्तकजत्रा यांसारखे उपक्रमही राबवत आहेत. काही सेवाभावी संस्था, प्रकाशक शाळेसाठी पुस्तके भेट म्हणून देतात; त्याचाही वापर वाचनालयासाठी करता येईल.

■■■


'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक.

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director.

# इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

## शाळांची कामकाजाची वेळ

साधारण दीडशे वर्षांपूर्वी, शिक्षणाचा प्रसार मर्यादित होता. शाळांची संख्याही मर्यादित होती. बहुतांश ठिकाणी व्हालंटरी (स्वयंसेवी) पद्धतीच्या शाळा होत्या. त्या बहुतेक एक शिक्षकी असायच्या. शाळा मंदिरात किंवा सार्वजनिक ठिकाणी भरायच्या. जागेच्या आणि शिक्षकांच्या सोयीनुसार सकाळी तीन तास व सायंकाळी तीन तास अशी दोनवेळा शाळा भरायची. यामध्ये शिक्षक व विद्यार्थी या दोघांची सोय होती. दुपारी साधारण चार तास वेळ मिळायचा. या वेळात शिक्षकांना दुपारची विश्रांती मिळायची किंवा इतर कामासाठी वेळ देता यायचा. विद्यार्थ्यांनाही दुपारच्या वेळात शेतीची, घरची कामे करता यायची.

१८८५ मध्ये शहरातील शाळा म्युनिसिपालिटीकडे वर्ग करण्यात आल्या. शहरातील शाळांचे नियंत्रण नगरपालिकेकडे आले. नगरपालिकेची कार्यालयीन वेळ दहा ते सहा अशी असायची. अधिकाऱ्यांना शाळांना भेटी द्यायच्या, तर दुपारी शाळा बंद त्यामुळे अडचण भासू लागली. त्यावर विचार करून शहरातील शाळा १८९४ पासून सकाळी दहा ते पाच अशा वेळात भरू लागल्या. त्याला सुरुवातीला थोडा विरोध झाला. त्यासंबंधीचे पत्र शालापत्रकाच्या जानेवारी, १८९४ च्या अंकात छापले आहे.

शहरातील शाळांच्या वेळा बदलल्यावर, काही वर्षांनी लोकल बोर्डाच्या शाळांच्या म्हणजेच ग्रामीण भागातील शाळांच्या वेळाही बदलण्यात आल्या. पूर्वी खेड्यात वीज नव्हती. सूर्यप्रकाशाच्या उजेडावर सर्व अवलंबून होते, त्यामुळे शाळा जरी दहा वाजता भरत असल्या, तरी सूर्याच्या प्रकाशानुसार शाळा सुटण्याच्या वेळा स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असत. गेल्या पन्नास वर्षांत शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली. शाळांच्या इमारती अपुऱ्या पडू लागल्या, तेव्हापासून दुबार पद्धतीच्या शाळा सुरू झाल्या. एकाच इमारतीत सकाळ सत्र व दुपार सत्र अशा दोन सत्रांत शाळा भरू लागल्या.

साधारण शंभर वर्षांपूर्वी कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराला दररोज बारा ते चौदा तास काम करावे लागे. नंतरच्या काळात कामगारांच्या संघटनांच्या लढ्यामुळे कामाच्या वेळा कमी करण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर आठवड्याचे कामाचे तास ४८ ते ५४ इतके करण्यात आले. दररोज साधारण आठ तास काम असे गृहीत धरण्यात आले, पण बौद्धिक क्षेत्र मात्र याला अपवाद करण्यात आले. दररोज साधारण पाच ते सहा तास काम आणि इतर वेळ पूर्वतयारी व अध्ययनासाठी गृहीत धरण्यात आला. सध्याही शाळांची वेळ साधारण अशीच आहे.


MAHARASHTRA
Pahile Paul


MAHARASHTRA










ENSURING FOUNDATIONAL LITERACY AND NUMERACY
IN THE CONTEXT OF BLENDED LEARNING
Pune, Maharashtra
19th June, 2023


G20
2023 INDIA
ENSURING FOUNDATIONAL LITERACY AND NUMERACY
IN THE CONTEXT OF BLENDED LEARNING
Pune, Maharashtra
19th June, 2023

Date of Publication 3 July 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th July 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**







पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ______________________
______________________
______________________
______________________